# आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३४ वे अंक दुसरा पृष्ठे १४ फेब्रुवारी २०२५ www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92


या अंकात


पान ०२ वॉर्ड ८४, ८५ - थोडा है... थोडे की जरूरत है

पान ०६ 'पार्ले स्वर वसंत'- गुणी कलाकारांची मांदियाळी

पान ०८ किमया स्टेम सेल्सची - डॉ. रमेश भोंडे

पान ११ उत्कट एकल नाट्याविष्कार- 'सांगत्ये ऐका'




पान ४ निरपेक्ष समाजसेवेची, गाथा उत्कर्षाची

# पार्ल्यात बहरला 'स्वर-वसंत'




पार्ले नगरीला मुंबईची सांस्कृतिक राजधानी म्हणून संबोधलं जातं आणि पार्ल्यात होत असणाऱ्या विविध कार्यक्रमांमुळे ते सातत्याने सिद्धही होत असतं. त्यातीलच एक महत्वाचा सांस्कृतिक उपक्रम म्हणजे 'पार्ले स्वर वसंत' हा शास्त्रीय संगीताचा महोत्सव.

सालाबादप्रमाणे या वर्षीही पार्ल्यातील संगीत रसिकांना मेजवानी घेऊन येणारा 'पार्ले स्वर वसंत 'या वर्षी ३१ जाने,१,२ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला.

आजच्या आघाडीच्या शास्त्रीय गायिका श्रीमती गौरी पाठारे यांच्या ईश्वरी-स्वर फाउंडेशन व रामांजनेय देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने वसंत पंचमीचे औचित्य साधून 'पार्ले स्वर वसंत' हा शास्त्रीय संगीत महोत्सव लक्ष्मीनारायण प्रसाद लॉन्स येथे चोखंदळ रसिक श्रोत्यांच्या उत्तम प्रतिसादात पार पडला. 'पार्ले स्वर वसंत' या महोत्सवाचं यंदाचं हे बारावं वर्ष. स्वत: गौरी पाठारे शास्त्रीय संगीताच्या मैफिली, कार्यक्रम यात व्यस्त असूनदेखील इतर गुणी कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्याचे मोलाचे कार्य त्यांच्या संस्थेमार्फत सातत्याने करत आहेत. दरवर्षीप्रमाणे या ही वर्षीही अनेक दिग्गज कलाकारांनी आपली कला या महोत्सवात सादर केली. नवनवीन व गुणी कलाकार रसिक श्रोत्यांसमोर यावेत या उद्देशाने ह्या सांगीतिक चळवळीची सुरवात करण्यात आली आहे. शास्त्रीय संगीत हा आपल्या भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा अधिकाधिक रसिकांसमोर सातत्याने येत राहून त्याची आवड असणाऱ्या रसिक प्रेक्षकाला त्याचा खुल्या मनाने आनंद घेता यावा या हेतूने हा कार्यक्रम विनामूल्य ठेवला जातो. हा निरपेक्ष हेतू ठेऊन होणाऱ्या ह्या महोत्सवाचा अधिकाधिक रसिकांना आनंद घेता यावा या उद्देशाने 'आम्ही पार्लेकर' दरवर्षी या महोत्सवाच्या मीडिया पार्टनरची भूमिका बजावत असते.




## संपादकीय

गेल्या दहा पंधरा वर्षात पार्ल्याचा चेहरा मोहरा पार बदलून गेलाय. बैठ्या घरांची जागा टोलेजंग इमारती घेत आहेत, मार्केट तऱ्हतऱ्हेच्या दुकानांनी, वस्तूंनी नटलेले आहे. पूर्वी पार्ल्यात जीवन, रामकृष्ण, पूर्णिमा, आदर, सत्कार अशी मोजकीच हॉटेले होती पण आज परिस्थिती अशी आहे की संपूर्ण पार्ल्याचीच खाद्यनगरी झालीये की काय असे वाटते.

आज जवळ जवळ प्रत्येक रस्त्यावर विविध प्रकारची अगणित रेस्टॉरंट्स आहेत. हे कमी आहे की काय म्हणून प्रत्येक नाक्यावर, छोट्या छोट्या खोपटात, हातगाड्यांवर, जिथे जागा मिळेल तिथे, उघड्यावर खाद्यपदार्थांची अनिर्बंध विक्री सुरु आहे. वडापाव, पाणीपुरी, सँडविचेस, मोमोज, चायनीज भेळ, दाबेली, फ्रँकी, शावरमा, बुर्जीपाव, काय नाही मिळत इकडे ! सध्या सर्वांनाच बाहेरचे खाणे आवडते, परवडते. घरी स्वयंपाक करण्याचा कंटाळा येतो. सहाजिकच आहे, त्याबद्दल तक्रार असण्याचे कारणच नाही. माझा मुद्दा वेगळाच आहे.

सर्व रेस्टॉरंट्समधील खाद्यपदार्थांच्या दर्जाची सरकारतर्फे नियमितपणे (कशी का होईना पण) तपासणी होत असते. त्यांचे किचन, त्यातील गॅस कनेक्शन हे सर्वच तपासले जाते, परवान्याचे वर्षाकाठी नूतनीकरण करावे लागते. रस्त्यावरच्या खाद्यविक्रीचे काय? बहुतेक गाड्या बेकायदेशीर असतात. कुठले तेल, पाणी, कच्चा माल वापरतात कोणास ठाऊक! गॅस, कढई येवढ्या छोट्या जागेत असतात की कायमच आग लागण्याचा धोका असतो. असे आगीचे दोन तीन प्रसंग अलिकडेच पार्ल्यात घडलेले आहेत. गाडीवरचे खाऊन पोट बिघडण्याचे प्रसंग तर वारंवार होतच असतात.

काय करायचे ह्या रस्त्यावरील खाद्यविक्रीचे? कोण तपासणार ह्यांची कायदेशीरता, खाद्यपदार्थांचा दर्जा आणि सुरक्षा व्यवस्था? आमचे लोकप्रतिनिधी, पोलिस, प्रशासन ह्याकडे लक्ष देतील काय? की सर्वच हप्त्यांनी बांधलेले आहेत?

पार्लेकर
संपादक
ज्ञानेश चांदेकर
संपादकीय सहाय्य
भाग्यश्री महाजन
editorial@parlekar.com
जाहिरात व्यवस्थापन
marketing@parlekar.com
सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे – अेस ग्राफिक्स
निर्मिती
अनिता चांदेकर
www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : ९, अल्का, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४५१ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

## वॉर्ड ८४ व ८५
# थोडा है... थोडे की जरूरत है

आता महानगरपालिकेच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत. त्याआधी विलेपार्लेतील तीनही वॉर्डमधील समस्यांचा आपण आढावा घेत आहोत. गेल्या अंकात आम्ही बामणवाडा परिसरातल्या समस्या मांडल्या. तर आता आपण वॉर्ड क्रमांक ८४ व वॉर्ड क्रमांक ८५ या हायवे ते रेल्वे स्टेशनमधील परिसराच्या समस्या समजून घेऊया. आपल्या या वॉर्डमधील वस्ती ही मुख्यत्वे उच्च मध्यमवर्गीय, मध्यम व निम्न मध्यमवर्गात मोडते. त्यामुळे पार्ल्यातील सुशिक्षित व संस्कारीत वातावरणात इथल्या सर्वच पिढ्या वाढलेल्या असल्याने येथे गुन्हेगारी समस्या सारख्या गंभीर समस्या नाहीत. पाणी, वीज आदी गोष्टींची टंचाई नाही. इथे समस्या निर्माण करते ते वाढत असलेली लोकसंख्या. इमारतींचे पुनर्विकास, त्यामुळे होणारे प्रदूषण, रस्ते, पार्किंग आणि समाजाचा भला मोठा भाग असलेल्या जेष्ठांच्या समस्या.




यावर भाष्य करताना मोठ्या प्रमाणावर चाललेली पुनर्विकासाची कामे - यात सोसायटीचे पुनर्विकास व चाळ समूहांचे चाललेले एस आर ए प्रोजेक्ट दोन्ही येतात. त्यामुळे निर्माण होणाऱ्या वातावरण प्रदूषणाला पार्लेकरांना सामोरे जावे लागत आहे. त्यातच पार्लाभर चाललेले रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण. यातून उडणारी धूळ, धूर आणि कचऱ्याचे, डबरचे ढीग. याबद्दल किती बिल्डर काळजी घेत आहेत? राजकीय स्तरावर त्यांना आदेश दिले गेले आहेत असे समजते. पण त्याचं नियमन होत आहे किंवा नाही यावर कोणाचं नियंत्रण आहे? हा प्रश्नच आहे. त्याचप्रमाणे आता या सर्वच इमारतींमध्ये फ्लॅटची संख्या वाढते आहे. त्यामुळे पार्ल्यातील लोकसंख्येतही वाढ होते आहे व वाहनांच्या संख्येतही. त्यातच बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्याचे ट्रक, डंपर इत्यादी महाकाय वाहने मोठ्या प्रमाणात रस्त्यावर फिरत आहेत. वाढलेली लोकसंख्या ही सुखवस्तू असल्याने त्यांच्याकडील वाहन संख्याही वाढते आहे. मात्र त्यावेळी पार्ल्यातील रस्त्यांची रुंदी वाढत नाहीये. बिल्डर एक पार्किंग देतो, पण अनेकांकडे दोन किंवा अधिक वाहने असतात व त्यांना पार्किंगला इमारतीत जागाच नाही. जुन्या इमारतीत पार्किंगला जागा नाही. या कारणाने त्याच छोट्या रस्त्यावर पार्किंगने जागा अडवलेली आहे. एका महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्ष वेधून घेऊन इच्छिते की एस आर ए प्रोजेक्ट मध्ये पार्किंगला जागा असत नाही. मात्र आज सामान्य कुवतीच्या लोकांकडे पण दुचाक्या असतात. त्यातील काही लोक रिक्षा, ओला, उबर किंवा टॅक्सी यांचे मालक किंवा चालक असतात. अशावेळी त्यांनी वाहने कुठे ठेवायची? त्यांना इमारतीच्या तळमजल्यावर वा तळघरात ती सोय करून दिली तर फार मोठी समस्या सोडवली जाईल. यावर लोकप्रतिनिधींनी शासनाकडे अशी मागणी करावी अशी अपेक्षा आम्ही पार्लेकरतर्फे करत आहोत. पार्किंग प्रश्नांमध्येच विमानतळावरील वाढलेले पार्किंगचे दर पार्लेकरांच्या मुळावर आले आहेत. या टुरिस्ट गाड्यांवर काही उपाययोजना लोकप्रतिनिधी व ट्रॅफिक पोलीस यांच्या सहकार्याने त्वरित होण्याची नितांत गरज आहे.

गेल्या पंधरा अठरा वर्षात पार्ल्यातील रस्त्यांचे दोन-तीन वेळा डांबरीकरण, दोनदा पेवर ब्लॉक बसवणे व आता कॉंक्रिटीकरण चालू आहे. हे सर्व जरी चांगल्या भावनेतून होत असले तरी प्रत्येक वेळी त्यामुळे होणारी नागरिकांची गैरसोय याचा विचार कोणीच करत नाही का? असा प्रश्न उभा राहतो. त्यात पुन्हा गटारे, रस्ते आणि फुटपाथ यांचे काम वेगवेगळ्यावेळी होते. ते सर्व पूर्ण झाल्यावर इलेक्ट्रिसिटी, केबल, टेलिफोन आदी मंडळी रस्ते उखडते. त्यामुळे बारा महिने तेरा काळ खडबडीत, उखडलेल्या व अस्वच्छ रस्त्यावरून पादचारी व वाहने यांना प्रवास करावा लागतो. त्याचा सर्वात मोठा त्रास लहान मुले, स्त्रिया व वयोवृद्धांना भोगावा लागतो. आता कॉंक्रिटीकरण पूर्ण झाल्यावर हे त्रास कमी होतील असे लोकप्रतिनिधी म्हणतात. पण प्रत्येक रस्त्याचे काम महिनोंमहिने चालू आहे. त्यामुळे अर्धाच रस्ता वापरात आहे. त्याचं काय करायच? ज्यांची कामे झाली आहेत अशा श्रद्धानंद रोड तेजपाल स्कीम इथे पुन्हा एकदा ते रस्ते खणून ठेवले आहेत. अशी कामे झाल्यावर जे रस्ता दुरुस्तीचे काम होते ते कधीच जुन्या रस्त्याच्या लेव्हलचे नसते. तिथे हमखास पादचारी ठोकरून पडताना दिसतात. या अव्यवस्थितपणाकडे लक्ष दिले जाणार आहे का? त्याचप्रमाणे सोसायटीतून गाड्या बाहेर काढण्यासाठी ठेवलेले उतार हे प्रत्येकजण वेगवेगळे ठेवतो यात पादचाऱ्यांनी सतत फुटपाथवरून खाली वर करणे, या उतारावर तोल सावरत चालणे, अशक्य झाले आहे. या प्रकाराला काही नियमात बसवण्याचा विचार लोकप्रतिनिधी करतील का?

श्रद्धानंद रोड आणि मिलन सबवे यांच्या कॉर्नरवर वर्षानुवर्ष पाणी साठते. तिथे नाला बांधणी झाली, पण कचऱ्याचे ढीग हटत नाहीत. नाला पूर्ण बंद केलेला नाही. त्यामुळे डासांचे प्रमाण भयंकर आहे. दोन वर्षे तिथे पाणी साचले नाही पण यावर्षी पुन्हा पाणी साचू लागले आहे. तिथले पाणी निचरा होण्यासाठी बसवलेले पंप कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षित वर्तनाने वेळेवर सुरू होत नाहीत. त्यामुळे पाणी साचते अशी तेथील नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात तक्रार आहे. त्याचप्रमाणे संत मुक्ताबाई मार्गावर व एमटीएनएल परिसरात कोणीही वाहने लावून जातात व महिनोंमहिने त्याची दखल घेतली जात नाही. त्याखाली कचरा साठून राहतो व रहदारीलाही अडथळा होतो. त्याकडे ट्रॅफिक पोलिसांकडून हालचाल होण्यास विलंब होतो अशाही तक्रारी आहेत.

रमाबाई शाळा, पार्क रोड अशा अनेक रस्त्यांवरील नो पार्किंगचे बोर्ड गायब झाले आहेत. त्यामुळे लोक अनेकदा दोन्ही बाजूला गाड्या पार्क करतात व शाळा आणि इतर ठिकाणी रहदारीची समस्या मोठी होत जाते. महात्मा गांधी रोडवर आणि पार्ला भर फेरीवाल्यांची संख्या अनियंत्रित वाढत आहे. ही माणसे कोण आहेत? याचा तपास घेण्याची गरज आहे. रहदारी व्यतिरिक्त पार्ल्याच्या सुरक्षेलाही याचा धोका निर्माण होऊ शकतो. नुकत्याच पार्ल्यात दोन-तीन घरफोड्या झाल्या. चेन, मंगळसूत्र खेचणे हाही प्रकार घडत असतोच. २६ जानेवारीला अंधेरी पुलाखाली काही संशयित माणसे झेंडे विकताना पकडली गेली. तर काही पळून गेली. अशा घटना टाळण्याची नितांत गरज आहे. वॉर्ड नंबर ८५ मध्ये रस्ता सफाईच्या बाबतही नागरिकांची नाराजी आहे. मुख्य रस्ते रोज झाडले जातात पण आतील गल्ल्या चार-पाच दिवसांनी एकदा झाडल्या जातात असे सांगितले गेले. यासाठी विचारणा करता कर्मचारी वर्गात कपात केली गेली आहे असे महानगरपालिकेचे कचरा कर्मचारी कारण सांगत आहेत. यात लोकप्रतिनिधी लक्ष घालतील का?

श्रद्धानंद रोड, साई मंदिर येथील काही पार्लेकरांची चाळीतली घरे रस्ता रुंदीकरणात गेली. मात्र तीन-चार वर्षे उलटूनही त्यांना कोणत्याच एस आर ए प्रोजेक्ट मध्ये सामावून घेतले जात नाहीये. चिखलवाडी, रामवाडी या ठिकाणी महानगरपालिकेने गार्डन एरिया ठरवली आहे. त्यामुळे तिथल्या रहिवाशांचे एस आर ए होऊ शकत नाही. फक्त कोर्टात केस भिजत पडली आहे. अशावेळी महानगरपालिका अधिकारी व लोक प्रतिनिधी यांनी नागरिकांशी समन्वय साधून त्यांना विलेपार्ल्यातीलच एखाद्या एस आर ए प्रोजेक्ट मध्ये सामावून घेणे गरजेचे आहे. मोठमोठ्या एस आर ए प्रोजेक्टमध्ये पार्ल्याबाहेरचे, वेगळ्या

पान ४ वर

yono by SBI

Lifestyle & banking, dono.

yonosbi.com

Home Loan, Car Loan
Education Loan
Pension Loan
Gold Loan



**SERVICE OFFER**

- Saving Account
- Current Account
- Deposite Scheme
- Mobile Banking
- Digital Banking

SBI Card
SBI Demat Account
SBI Life Insurance
SBI General Insurance

SBI
The banker to every Indian

yono SBI

Azadi Ka Amrit Mahotsav

# Open a digital savings account of your loved ones on phone from the comfort of home.

Open savings account on YONO with simple steps.




*T&C apply

पान २ वरून

## वॉर्ड ८४ व ८५ - थोडा है.... थोडे की जरूरत है

धर्माचे लोक कारण नसताना घुसडले जात आहेत. मात्र इथले तीन चार पिढ्या राहत असलेल्या मराठी बांधवांना वाऱ्यावर सोडले जात आहे अशी मनोधारणा लोकांमध्ये पसरते आहे. यावर काही उपाययोजना होईल का?



पार्ल्यात फारशा पाण्याच्या समस्या नाहीत. मात्र कोलडोंगरी लेन १ व २ तसेच त्यांना जोडणारा मार्ग या ठिकाणी पाणी कमी दाबाने येते. पाईपलाईन बदलणे गरजेचे आहे असे नागरिकांचे म्हणणे आहे. हा विभाग लोकसभा व विधानसभेसाठी अंधेरी वॉर्डात जातो व महानगरपालिका निवडणुकीसाठी विलेपार्ल्याच्या वॉर्ड क्रमांक ८४ मध्ये येतो. त्यामुळे अनेकदा हा दोन्ही घरचा पाहुणा उपाशी राहतो असे दिसते. त्यात गेली तीन वर्षे महानगरपालिकेला अधिकृत नगरसेवकच नाहीत. त्यामुळे लहान समस्यांकडे दुर्लक्ष होते अशी जोरदार तक्रार वॉर्ड क्रमांक ८५ मधून येते आहे. याकडेही 'आम्ही पार्लेकर' कडून लोकप्रतिनिधीचे लक्ष वेधू इच्छितो. मात्र वॉर्ड क्रमांक ८४ मध्ये अशी तक्रार दिसत नाही इथे माजी नगरसेवकांचे वेगळेपण दिसून येत आहे. गेल्या अंकात बामणवाड्यातील समस्या मांडताना तेथे वाढणारी गुन्हेगारी व अमली पदार्थांचे सेवन व व्यापार यावर भाष्य केले होते. वॉर्ड ८४ व वॉर्ड ८५ येथे बहुतेक घरगुती सेवा पुरवणारे याच विभागातून येतात. अशावेळी या दोन वॉर्डातील रहिवाशांना व खास करून वयोवृद्ध व स्त्रियांना यापासून पहिला धोका संभवतो. याकडे लक्ष वेधून घेणे आम्हाला गरजेचे वाटते. तसेच याच दोन वॉर्डात जास्तीत जास्त शाळा व कॉलेज आहेत. त्यातील विद्यार्थ्यांवर ह्या अमली पदार्थांचे जाळे विणले जाऊ नये याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

पार्लेकरांच्या भल्यासाठी काही बाबी तातडीने होणे गरजेचे आहे.

१) महात्मा गांधी रोडवर गाडी थांबवणे व पार्क करणे प्रतिबंधित करावे.

२) टुरिस्ट गाड्यांच्या पार्किंग वर नियंत्रण ठेवणे.

३) नालेसफाई व परिसर स्वच्छतेकडे लक्ष पुरवणे.

४) रस्त्यांचे काम वेळेत पूर्ण करणे.

५) काम चालू असताना ते कोण करत आहे? त्या कंत्राटदाराचे नाव, पत्ता, संपर्क याचा बोर्ड लावणे (ते कायद्याने अनिवार्य आहे.)

६) मराठी व पूर्वापार पार्लेकरांना विस्थापित होण्यापासून वाचवणे.

७) बामणवाडा व आजूबाजूच्या परिसरात वाढणारे अमली पदार्थ व गुन्हेगारी वृत्तीला तातडीने आळा घालणे. (कारण याचा पहिला फटका हा सुस्थापित विलेपार्ले परिसरालाच बसणार आहे.)

८) पुनर्विकासाची कामे करणाऱ्या सर्वच विकासकांकडून कायद्याचे आणि प्रदूषण नियंत्रणाचे उल्लंघन होणार नाही यावर लक्ष ठेवणे.

९) फेरीवाल्यांच्या अधिकृततेवर व वाढीवर नियंत्रण ठेवणे.

आता निवडणुकांनंतर निवडून येणाऱ्या आणि सद्यस्थितीतील माजी नगरसेवक असणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या लोकप्रतिनिधींनी वरील गोष्टींकडे लक्ष पुरवणे गरजेचे आहे. या सर्व प्रश्नांवर पार्ले रहिवासी जागरूक आहेत. व म्हणूनच लोकप्रतिनिधींचे भवितव्य ही त्यावरच अवलंबून आहे. याची आठवण 'आम्ही पार्लेकर' तर्फे करून देत आहोत.



छायाचित्रे - संजय देवस्थळी

संगीता बेहेरे
९८६७७५८३१०

## मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचा वर्धापन दिन साजरा

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय विलेपार्ले शाखेचा वर्धापन दिन ६ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ५ वाजता उत्कर्ष मंडळाच्या सभागृहामध्ये साजरा करण्यात आला.




सुप्रसिद्ध गझलकार सदानंद डबीर यांची चारुलता काळे यांनी घेतलेली मुलाखत हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. कार्यक्रमातील मुं. म. ग्रं. सं. विलेपार्ले शाखेच्या कार्यवाह प्रकाशिका साहित्यिका लता गुठे, ज्येष्ठ लेखिका माधवी कुंटे आणि कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे 'आम्ही पार्लेकर'चे संपादक ज्ञानेश चांदेकर यांची भाषणेही खुमासदार झाली. यावेळी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या विलेपार्ले शाखेच्या सभासदांच्या साहित्यकृतीला पुरस्कार देण्यात आले. त्यामध्ये निशा वर्तक व प्रशांत राऊत यांना सन्मानित करण्यात आले.

# निरपेक्ष समाजसेवेची, गाथा उत्कर्षाची

शनिवार दिनांक २२ डिसेंबर २०२४ उत्कर्ष मंडळाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त सहा डिसेंबर १९६४ पासून आज पर्यंत म्हणजे




२०२४ पर्यंत मंडळाच्या कार्यकारीणीत समाविष्ट असलेल्या सर्व कार्यकर्त्यांचा सन्मान केला गेला. जे हयात आहेत ते स्वतः आले होते आणि काळाच्या पडद्याआड गेलेल्यांचे वारस - प्रतिनिधी आले होते.

जुन्या कार्यकर्त्यांना भेटून आनंद झालाच आणि वेगवेगळ्या आठवणींना उजाळा मिळाला.

काही मध्यमवयीन व तरुण व्यक्ती सामाजिक ऋण फेडण्याच्या दृष्टीने एकत्र आल्या आणि विचार मंथन करून निश्चयाने ६ डिसेंबर १९६४ रोजी त्यांनी मंडळाची मुहूर्तमेढ रोवली. संस्थेचे नाव निश्चित केलं 'उत्कर्ष मंडळ विलेपारले'.

ध्येय वचन ठरवलं, भगवद्गीतेतील 'उद्धरेत आत्मना आत्मानम', अर्थात स्वतःचा अभ्युदय स्वतःच करून घ्यायचा.

संस्थेला १९६४ ते १९७० पर्यंत स्वतःची वास्तू नव्हती त्यामुळे कोणा कार्यकर्त्यांच्या घरी बैठका होत, किंवा देशस्थ ऋग्वेदी मंडळाच्या आणि लोकमान्य सेवा संघाच्या जागेत बैठकी होत असत.

संस्थेला स्वतःची वास्तू असावी या विचारातून इमारत निधी निर्माण करण्यासाठी १९६९-७० च्या कार्यकारिणीने रुपये २८०००/-, अर्थात त्या काळातले, इतकी रक्कम बाजूला काढली. महंत रस्ता आणि मालवीय रस्ता यांच्या नाक्यावर असलेली श्री दिवेकर यांची अंदाजे सातशे वार जागा घेण्यात आली. इमारतीच्या कामाला दिनांक १६ ऑक्टोबर १९८३ रोजी सुरुवात झाली आणि इमारतीचे काम योजनेप्रमाणे अत्यंत वेगाने पार पडले.

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर दिनांक २२ मार्च १९८५ रोजी वास्तूत प्रवेश करताना इमारत उभी करण्यासाठी मंडळाचे संस्थापक कार्यवाहक श्री अशोक जोशी आणि श्री दामले यांनी अपरंपार कष्ट घेतले अर्थात त्यांच्याबरोबर त्यांचे अनेक सहकारी होतेच.

स्वतःची इमारत उभी राहिल्याबरोबर श्रीमती सहस्त्रबुद्धे चालवीत असलेली मूकबधिर दिव्यांगांसाठीची शाळा ही इमारतीत आली. तळघर आणि तळमजला मंगल कार्यादी कार्यक्रमांना भाड्याने देण्याचे ठरले, कारण संस्थेलाही स्वतःच्या पायावर उभे राहायचे होते. २४ फेब्रुवारी १९९१ रोजी चैतन्य फिजिओथेरपी केंद्र सुरू झाले. श्री वसंतराव आणि उषाताई खरे यांच्या देणगीतून सुरू झालेले हे केंद्र आजही इतर ठिकाणांपेक्षा कमी पैसे आकारून ही सेवा देतच आहे.

फोटोग्राफी वर्ग, बुद्धिबळ प्रशिक्षण, रायफल शूटिंग, रक्तदान शिबिर, रक्तगट सूची, हापकिडो वर्ग, कीर्तन वर्ग असे नाना उपक्रम सुरू झाले.

१९९३ रोजी मंडळाच्या शिरपेचात आणखी एक तुरा खोवणारी गोष्ट झाली. मंडळ २५ वर्षांहून अधिक वर्ष करत असलेल्या सांस्कृतिक सामाजिक आणि शैक्षणिक कार्याची योग्य दखल घेत आणि श्रीमती मंगलाताई जोशी या नगरसेविका असल्याने त्यांच्या पुढाकाराने मंडळाच्या वास्तू समोरील चौकाला उत्कर्ष मंडळ चौक असं नामकरण करण्यास महानगर महानगरपालिकेने मान्यता दिली.

सर्वात महत्त्वाचा उपक्रम म्हणजे मूकबधिर




पान ५ वर

पान ४ वरून

## निरपेक्ष समाजसेवेची, गाथा उत्कर्षाची

दिव्यांगांसाठी जी शाळा श्रीमती सहस्त्रबुद्धे चालवीत होत्या ती १९८३ पासून जरी आपण



आपात्कालीन मदत कार्य

सुरू केली असली तरी मंडळाच्या वास्तूमध्ये १९८५ मध्ये आली

नरेंद्र जामनेरकर यांनी शाळेला चार लाख रुपये देणगी दिली आणि दिनांक २६.०९.१९९९ रोजी शाळेचे नाव 'स्वर्गीय सौ उषाताई जामनेरकर मूकबधिर विद्यालय' असं करण्यात आलं

मुलांसाठी अविरत मेहनत करणाऱ्या आणि मुलांवर प्रेम करणाऱ्या शिक्षकांनी मुलांना एक अनोखी- अद्भुत संधी उपलब्ध करून दिली.

२००६ मध्ये श्री अटल बिहारी वाजपेयी आणि त्यानंतर दोन वर्षांनी राष्ट्रपती डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांना



आरोग्य

भेटण्याची संधी शाळेतील विद्यार्थ्यांना मिळाली. इथपर्यंतची सर्व माहिती माझ्यासाठी ही ऐकिव आणि लेखी स्वरूपात होती.

तिची पुष्टी इतरांनी सुवर्ण महोत्सवी वर्ष २०१४ मध्ये लिहिलेल्या लेखातून झाली.

वर्ष २००० सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी स्वेच्छा निवृत्ती योजनेची घोषणा केली. २५ वर्ष बँकेच्या कामात मनापासून रमलेल्या, ग्राहकांशी सुसंवाद साधता येत असल्याने त्यांच्याकडून स्तुतीपर शब्द ऐकून सुखावणाऱ्या माझ्यासारख्या अनेक व्यक्तींच्या मनात स्वेच्छा निवृत्तीचे विचार येऊ लागले. २५ वर्ष नोकरी करीत असल्याने संपूर्ण दिवस व्यस्त असणाऱ्या मला 'निवृत्तीनंतर



कला

काय करायचं' याचा विचार करणं आवश्यकच होतं. विचारांती, नोकरीच्या ताणतणावामुळे कामाच्या तासांमुळे, आत्तापर्यंत जे जे करणं अशक्य होतं ते ते आपल्या आवडीचं, आपल्या आनंदासाठी करायचं असं ठरवलं .

उत्कर्ष मंडळात विद्यार्थ्यांसाठी चालणाऱ्या शिबिरात 'वाचन' या विषयावर दोन वर्ग घेतले आणि त्या संदर्भात मंडळाच्या कार्यकारिणीतील श्रीमती आशाताई जोशी यांच्या संपर्कात आले. आशाताई माणसांना कार्यप्रवण करीत संस्थेशी जोडण्यात वाकबगार! त्यांनी मंडळातील स्त्रियांसाठीच्या पुस्तक



कौशल्य विकास

भिशीत मला सामील करून घेतलं, आणि २००१ मध्ये मंडळाची सभासद करून घेतलं.

२००२ मध्ये आग्रह करून त्यांनी माझा




ग्रंथगौरव पुरस्कार

कार्यकारणीतही समावेश करून घेतला.

सुरुवातीपासूनच ग्रंथ वाचनाची आवड असल्याने, १९९४ पासून श्रीयुत अशोक जोशी यांच्या देणगीतून सुरू असलेल्या डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार ग्रंथ गौरव पुरस्कार साठीच्या निवड समितीत मी काम करू लागले, आणि २००६ पासून तर या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारून गेली १८ वर्ष हा उपक्रम मंडळात यशस्वीपणे राबवण्याचा काम केलं. अर्थात माझ्या सहकाऱ्यांचं पूर्ण सहकार्य होतच.

या अनेक वर्षात श्रीमती प्रतिभा रानडे, अचला जोशी, विनया खडपेकर, लेफ्टनंट जनरल के. एम ब्रार, शशिकांत पित्रे, माधवराव गाडगीळ, श्रीमती भारती ठाकूर आणि डॉक्टर मिलिंद वाटवे अशा अनेक विद्वान, शब्दप्रभू, कार्यप्रवण आणि समाजप्रेमी व्यक्तींशी संपर्क साधता आला. त्यांचे विचार ऐकता आले त्यांचे ग्रंथ वाचता आले. आमच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातच, एखादी समाजसेवी व्यक्ती किंवा संस्था यांना 'भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सेवाव्रती' पुरस्कार देण्याची योजना तयार केली. त्यानुसार २०१६ पासून दरवर्षी देण्यात येणारा हा पुरस्कार २०२४ ला पार्ल्यातीलच, रुग्णांसाठी सेविका अत्यंत आवश्यक आणि अनमोल काम करणाऱ्या जिजामाता केंद्राला देण्याचे निश्चित केले आहे.

याशिवाय गेली अनेक वर्षे वाडा तालुक्यातील कित्येक गावांना मंडळाने मदतीचा हात पुढे केला आहे. ठिबक सिंचन, पाईपद्वारे पाणीपुरवठा, शेतांना कुंपण, भाजी दुबारा पीक घेण्यासाठी ग्रामस्थांना मदत, वृक्षारोपण अशा अनेक उपक्रमातून अनेक गावांशी मंडळ जोडले गेले आहे.

पार्ल्यातील संभाजीनगर, भाजीवाडी, आंबेवाडी आणि वांद्रे येथील वाल्मिकी नगर या ठिकाणी मंडळातर्फे मुलांसाठी संस्कार वर्ग घेतले जातात. याच वस्तीतील मुलांसाठी 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या चित्रपटाची तिकिटे विनामूल्य उपलब्ध करून दिली होती आणि त्यानिमित्ताने त्यांच्याशी संवाद साधता आला.

वस्तीतील १३ गरजू महिलांना घरघंटी देऊन त्यांना स्वावलंबी होण्यास मदत केली गेली.

योगासनांचे वर्ग, विविध वाख्यानमाला, कथ्थक, भरतनाट्यम अशा नृत्य प्रकारांचे वर्गही मंडळात नेहमीच चालू असतात. संस्कार भारतीच्या रांगोळी वर्गांचे ही प्रशिक्षण गेली अनेक वर्षे संस्थेत दिले जाते भोंडला, मंगळागौर अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही केले जाते. आता मुलांसाठी एअरपोर्ट या शाळेच्या सहाय्याने त्यांच्या मैदानात व्हॉलीबॉल अकादमी सुरु केली आहे.

हल्लीच सुभाष रोडवर, महानगरपालिकेने सुरू केलेल्या मुलांसाठीच्या अभ्यासिकेचे पालकत्वही मंडळाने घेतले आहे. अशा उपक्रमांसाठी टेक महिंद्र फाउंडेशन, वरली इंडिया, स्टेट बँक, आयएन एक्सचेंज अशा संस्थांकडून अर्थ सहाय्यही मिळत आले आहे.

या सर्व उपक्रमांशी जवळून जोडले गेल्याने व्यक्तिशः मला भरपूर आनंद मिळाला. मी माझ्या क्षमतेनुसार मंडळाच्या कार्यात योगदान दिले हे खरे असले तरी पार्लेकर असण्याचा



योग

खरा अर्थ आणि आनंद मंडळात काम करीत असल्यामुळे मिळाल्याने माझे आयुष्य समाधानी आणि समृद्ध झाले आहे हे निश्चित.



**अलका गोडबोले**
९९६७६६६६७०

# ‘पार्ले स्वर वसंत’- गुणी कलाकारांची मांदियाळी

वसंतपंचमीचे औचित्य साधून विलेपार्ले पूर्व येथे विदुषी गौरी पाठारे यांचे ईश्वरी-स्वर फाउंडेशन आणि रामांजनेय देवस्थान व शानभाग कुटुंबीयांतर्फे लक्ष्मी नारायण प्रसाद लॉन्सवर दि. ३१ जानेवारी व १, २ फेब्रुवारी २०२५ असा तीन दिवसीय ‘पार्ले स्वरवसंत २०२५’ हा संगीतमहोत्सव साजरा झाला. या




महोत्सवाचे हे बारावे वर्ष असून दर वर्षी नवीन उत्तमोत्तम कलाकारांचे संगीत श्रोत्यांना विनामूल्य ऐकवून कलेची सेवा करायचे ब्रीद वि. गौरीताईंनी या ही वर्षी राखले आहे. या वर्षीचा महोत्सव रामांजनेय देवस्थानाचे मुख्य पुरोहित कै. श्री. विठ्ठल शानभाग यांच्या स्मृतीला समर्पित होता.

पहिल्या दिवसाच्या पहिल्या कलाकार गानहिरा सौ. हेमा उपासनी यांनी प्रथम राग पूरिया धनाश्री रूढ पद्धतीने गायला आणि त्यानंतर राग हंसध्वनीमधील पंचमसवारी या अनवट तालामध्ये वडील व गुरू पं. नाथ नेरळकर यांची ‘सब मिल गावो, बजावो, रिझावो’ ही रचना सादर केली. अनोख्या रंगात‘अवघा रंग एक झाला’ हा अभंग आणि एक मराठी गज़लही त्या गायल्या.त्यांना संवादिनीवर श्री. निरंजन लेले व तबल्यावर श्री. मंदार पुराणिक यांनी अतिशय समर्पक साथसंगत केली. त्यानंतर कै. अन्नपूर्णा देवींचे शिष्य,ज्येष्ठ बासरीवादक पं. नित्यानंद हळदीपूर यांनी राग यमन व मिश्र पिलू धून सादर करून आपल्या वेणूनादाने संपूर्ण श्रोतृवर्गाला तृप्तीची अनुभूती दिली. युवा कलाकार श्री. रोहित देव यांनी पंडितजींना तबलासाथ केली. त्यानंतर वि. गौरी पाठारे यांनी आपले वडील डॉ. सुरेश दामले यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ युवा कलाकारांसाठी सुरू केलेल्या प्रोत्साहनपर पुरस्काराने श्री. रोहित देव यांना सन्मानित केले. आयोजनाच्या गडबडीत असूनही गौरीताईंनी राग रागेश्रीतील बडा ख्याल ‘अत मन भाए’ व छोटा ख्याल ‘मोरा मन हर लिनो श्याम’ तसेच सुप्रसिद्ध दादरा ‘कोयलिया मत कर पुकार’ गाऊन रसिकांच्या मनावर भुरळ घातली. श्री. निरंजन लेले यांनी व श्री. रोहित देव यांनी गौरीताईंना रंगतदार साथ केली.

१ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. रेवा नातू यांनी राग भीमपलासीमधील ‘अब तो बडी देर’ व ‘बिरज में धूम मचायो श्याम’ या बंदिशी भावपूर्ण सादर केल्या. राग दुर्गा व त्यानंतर ‘ताने स्वर रंगवावा, मग तो आणि रघुनाथ गावा’ या राग प्रतीक्षा/भूपेश्वरीमधील अभंगाने




आपल्या गायनाचा समारोप त्यांनी केला. त्यांना सुंदर साथ होती सौ. सुप्रिया मोडक जोशी(संवादिनी) आणि श्री. पुष्कराज जोशी (तबला)यांची. नंतर Insync या शास्त्रीय संगीतासाठी वाहिलेल्या दूरदर्शन वाहिनीचे संस्थापक आणि सुप्रसिद्ध व्हायोलिनवादक डॉ. रतीश तागडे यांनी राग जोगकंसमध्ये रसपूर्ण आलापी व तंत अंगाने जोड व झाला उत्कृष्टपणे सादर केले. व्हॉयलिनवर ‘माझे माहेर पंढरी’ व ‘रघुपति राघव राजाराम’ या रचनांच्या लोकप्रिय धुरा वाजवल्या. त्यांना श्री. स्वप्नील भिसे यांनी उत्तम तबलासाथ केली.

दुसऱ्या दिवसाची सांगता वि. पद्मा तळवलकर यांच्या मधुर आणि रसाळ गायनाने झाली. मारूबिहागमधील ‘तरपत रैनदिन’ व राग अभोगीमधील ‘सपने में आये श्याम’ व ‘लाज राखो मोरी’ या बंदिशी त्या गायल्या. पद्माताईंच्या अमृतमहोत्सवानिमित्त त्यांच्या शिष्या, वि. गौरी पाठारे व त्यांच्या शिष्यांनी पद्माताईंना औक्षण केले व पुष्पहार, साडी, भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान केला.




महोत्सवाला आशीर्वाद देण्यासाठी आलेले ज्येष्ठ तबलावादक पं. ओंकार गुलवडी यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त त्यांचाही सन्मान करण्यात आला. यानिमित्ताने प्रा. केशव परांजपे यांनी पद्माताईंच्या कारकीर्दीचा मार्मिक वेध घेत त्यांचा गौरव केला. या हृद्य सोहळ्यानंतर पद्माताईंची भैरवी काळजाला भिडणारी होती. सौ. सुप्रिया मोडक जोशी आणि श्री. तेजस माजगांवकर (तबला)यांची त साथसंगत तयारीची तरीही संयत होती.




२ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. विराज अमर यांनी आपल्या गमकयुक्त गायकीतून राग गावती व राग चारुकेशीमधील त्यांच्या गुरूंनी रचलेल्या काही बंदिशी सादर करून रसिकांना गुंग केले. त्यांना सौ. सुप्रिया मोडक जोशी व श्री. पुष्कराज जोशी यांनी साजेशी साथ केली. त्यानंतर पं. रवींद्र चारी यांच्या सतारझंकाराने श्रोत्यांचे रंजन केले. त्यांनी राग हमीरमध्ये आलाप-जोड- झाला व दोन गति व एक लोकधून ऐकवली. श्री. अमित कवठेकर यांनी त्यांना चुस्त तबलासाथ केली.

महोत्सवाची सांगता वि. आशा खाडिलकर यांच्या गायनाने झाली. त्यांनी राग मधुकंसमधील सुप्रसिद्ध बंदीश ‘दे हो दीनदयाल’ व द्रुत एकतालातील ‘पार करो मोरी नैया’ ही स्वरचित बंदीश सादर केली. त्यानंतर ‘राग मारू बसंत’ मध्ये ‘रसिया मंद ऋत आयी’ ही सतारवादक पं. शंकर अभ्यंकर यांनी रचलेली बंदीश व नंतर राग बसंतमध्ये एक तराणा सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांना निरंजन लेले व मंदार पुराणिक यांनी समंजस साथ केली. वि. आशाताईंच्या सत्तरीनिमित्त वि. गौरी पाठारे यांनी त्यांचे अभीष्टचिंतन केले. या महोत्सवाचे उत्साहवर्धक निवेदन वरदा रिसबूड यांनी केले. महोत्सवाचे माध्यम सहकारी होते आम्ही पार्लेकर. श्री. योगेन व सौ. बागेश्री परीख, श्री. विनोद खरसीकर, श्री. मुकुंद चितळे, श्री. जैमिन भट्ट यांनी उत्सवाला उदार आर्थिक सहकार्य केले.





वरदा रिसबूड


प्रा. केशव परांजपे
७७३८६७४३२१

# इतिहासाशी जडले नाते

काही वेळा असे घडते की आपला एखाद्या गोष्टीशी काहीही संबंध नसतो , पण तरी ध्यानी मनी नसता ती गोष्ट आपल्या आयुष्यात येते , आणि आपल्याही न कळत आपण त्यात ओढले जातो.



पार्ल्याच्या विराज सरदेसाई ह्यांच्या बाबतीतही असेच घडले.

आता 'डॉ.आनंदी बाई जोशी' हे नांव आपल्या पिढीतल्या, सर्व मराठी वाचणाऱ्या लोकांना माहीत आहे. वर्तमानपत्रातून, रेडिओ टिव्हीवर, त्यांच्यावरच्या लिखाणातून , नाटक सिनेमामुळे भारतातली पहिली डॉ. स्त्री म्हणून त्या आपल्याला माहित आहेत. आपल्याला त्यांचा अभिमान आहे. पण ह्या शिवाय आपला तसा त्यांच्याशी संबंध येत नाही. विराज ह्यांचाही त्यांच्याशी काहीच संबंध नव्हता.

आता तुम्हीच पहा ना.. १९७३ साली विराज पार्ले टिळक विद्यालयातून टेक्निकल वर्गातून मॅट्रिक पास झाले. नंतर १९७९ मध्ये त्यांनी आय.आय.टी मधून मेटलर्जिकल इंजिनियर (बी. टेक) ही पदवी सिल्वर मेडल सकट मिळवली. त्यांनी १९८१ मध्ये अमेरिकेतून त्यांचे मास्टर्स केले. तेव्हापासून त्यांनी सेमीकंन्डकटर प्रोसेस डेव्हलपमेंट मध्ये आय बी एम (IBM) आणि नंतर ग्लोबल फाऊंडरिज मध्ये काम केले. त्यांच्या करीअरमध्ये त्यांनी आतापर्यंत ५८ अमेरिकन पेटंट्स आणि ६ जगभरातली इतर पेटंट मिळवली आहेत व मास्टर इन्व्हेंटर म्हणून मान्यता मिळवली आहे. त्यांनी अनेक पेपर्स लिहीले आहेत .

अशी सर्व त्यांची वाटचाल चालू असतांना सुरवातीच्या काळात ते १९८६ मध्ये ते न्यूयॉर्कमध्ये Poughkeepsie (पोकीप्सी) या ठिकाणी रहायला आले आणि परत एकदा डॉ. आनंदी बाई जोशी हे नांव विराज ह्यांच्या समोर आले.

डॉ. अशोक गोरे ह्या स्नेह्यांकडे ते जेवायला गेले होते आणि त्यांनी विराज ह्यांना ९८ वर्षापूर्वी प्रसिद्ध झालेले एक जुने पुस्तक दाखवले . १८८८ साली म्हणजे आनंदीबाईंच्या मृत्यूनंतर (२६/२/१८८७) Mrs. Caroline Healey Dall ह्यांनी लिहीलेले ते पुस्तक होते.. 'Life of Dr. Anandabai Joshee'.. ह्या पुस्तकात शेवटी लिहीलेले एक वाक्य होते ..अनेकांना त्यासंबंधी माहित नसेल .. त्याचा मतितार्थ असा होता...

"डॉ. आनंदी बाईंचे पती गोपाळराव जोशी, हे अनेक अडथळे व विरोध सहन करून, केवळ आनंदीबाईंचे अमेरिकेत डॉक्टरी शिक्षण झाले असल्यामुळे, त्यांचे या देशावरचे प्रेम लक्षांत घेऊन, त्यांची रक्षा घेऊन ते अमेरिकेत येत आहेत. ती रक्षा Poughkeepsie (पोकीप्सी) इथल्या दफनभूमीत दफन करण्यात येईल व त्यावर असलेल्या दगडावर, आनंदीबाईंची ओळख लिहीण्यात येईल."

केवळ विराज त्याच गावात रहात असल्यामुळे त्यांना ही जागा शोधण्याची विनंती डॉ. अशोक ह्यांनी केली होती. परंतु कार्यबाहुल्यामुळे विराज ह्यांना ते शोधता आले नाही. इतक्या मोठ्या शहरात नक्की पत्ता माहित नसतांना, जन्म मृत्यूची नोंद नसतांना ते शोधणे कठिण होते.

डॉ. अशोक हे संशोधक, व्यासंगी आणि उत्साही होते. त्यांच्या नातेवाईक डॉ.अंजली किर्तने ह्या १९९१ साली अमेरिकेत येणार होत्या. त्याही संशोधक, चरित्रकार, लेखिका होत्या आणि तेंव्हा डॉ. आनंदीबाईंच्या जीवनाची माहिती घेत होत्या. "त्यांना ती दफन भूमी पहायची आहे, तेव्हा परत जरा शोध घे"... असा निरोप आल्यावर विराज ह्यांनी त्याचा शोध घ्यायचे ठरवले. पोकीप्सिमध्ये १८८०च्या दशकात एकंदर ६ दफनभूमी होत्या. तिथे फोन केल्यावर कळले की त्यातल्या ५ फक्त कॅथलिक ख्रिश्चनांसाठीच होत्या आणि फक्त एकच इतर पंथांच्या लोकांसाठी होती. मग शोध जरा सोपा झाला. त्या दफनभूमीचा नकाशा मिळवून जागा शोधणे आणखी सहज झाले. तिथे आनंदीबाईची रक्षा दफन केलेला दगड दिसला. खूप वर्ष झाली असल्यामुळे त्यावरची अक्षरं धूसर झाली होती. त्यावर लिहीले होते..

'Anandabai Joshee M.D. १८६५-१८८७ First Brahmin Woman to leave India to obtain an education'..




कारपेंटर फॅमिलीचे हे आपल्यावर उपकारच आहेत .

आता तिथे नवीन अक्षरे कोरलेला दगड बसवण्यात आला आहे. तो नक्कीच पुढची १०० वर्षे तरी टिकेल. डॉ. आनंदीबाईंचे हे समाधी स्थळ अशा रिताने जगासमोर आले आहे. अंजलीताईंना ही दफनभूमी पहायला मिळाली. त्यांच्या आनंदीबाईच्या लघुपटाला १९९३ साली महाराष्ट्र शासनाचे बक्षिसही मिळाले. २००१ मध्ये त्याचे पुस्तक ही निघाले. अशा रितीने विराज आनंदीबाईंशी जोडले गेले. त्यांची त्याबद्दल BMM नी घेतलेली मुलाखत आणि लेखही प्रसिध्द झाले आहे. विराज आणखी एका गोष्टीसाठी प्रसिध्द आहेत. विसाव्या शतकात धातूशास्त्राच्या इंजिनिअरींगच्या पुस्तकात शिकवले जात असे की Lost wax process of metal casting प्रथम अठराव्या शतकात फ्रांसमध्ये डेव्हलप केली गेली व तेथून सर्वदूर पसरली. त्यांच्या अभ्यासात ज्ञानेश्वरीच्या काही ओव्यांतून आणि एका अभंगावरून त्यांच्या लक्षांत आले की ज्ञानेश्वर माउली त्याच धातू प्रक्रियेचे दाखले देत आहेत ! मग त्यांनी Lost Wax Process of Metal Casting in 13th Centuery Indiea हा टेक्निकल पेपर लिहून आपला इतिहास भारतीय धातूशास्त्रज्ञांना उजळ करून दिला.

विराज ह्यांचा ज्ञानेश्वरी आणि तुकारामांचे अभंग ह्याचा गाढा अभ्यास आहे. प्रत्येक मराठी माणसानी ते आपल्या संस्कृतीचे ऐश्वर्य समजून वाचले पाहिजे आणि जपले पाहिजे असे त्यांना मनापासून वाटते. पुढच्या पिढीनेही हे साहित्य वाचावे म्हणून त्यांनी अभंगांचा आणि ओव्यांचा अनुवाद केला आहे आणि लवकरच त्यांची पुस्तकं प्रकाशित होणार आहेत.

त्यांची शैक्षणिक आणि नंतर नोकरीतली कारकिर्द अतिशय दैदिप्तमान आहे . अनेक मान सन्मान, पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. त्यांनी मराठीसाठी केलेले हे कार्यही नक्कीच वाखाणण्यासारखे आहे.

पार्लेकरांना विराज सरदेसाई ह्यांचा अभिमान आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी खूप शुभेच्छा !



**चित्रा मेहेंदळे**
camehendale@gmail.com

# नागरिक दक्षता शाखा 'पाणी हे जीवन'




लोकमान्य सेवा संघाच्या नागरिक दक्षता शाखेने दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी जलतज्ञ व जलअभ्यासक उल्हास परांजपे यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित केला होता. नागरिक दक्षता शाखेने ' थेट भेट' या मालिकेअंतर्गत हा कार्यक्रम सादर केला. हे होते पुष्प दुसरे !

पाणी हे जीवन ! असं आपण म्हणतो पण प्रत्यक्षात मात्र आपण शहरी नागरिक पाण्याचा अपव्यय करतो. ग्रामीण भागात तर परिस्थिती गंभीर आहे. पण त्यासाठी पाणी अडवा, पाणी जिरवा हाच एक मार्ग आहे. यापैकी पाणी अडवा हा मार्ग पाणी टंचाईवर मात करणारा आहे हे उल्हास परांजपे यांनी सिध्द करून दाखवले आहे. आपल्या जलवर्धिनी ट्रस्टमार्फत



फेरोक्रिट तंत्रदयानाचा वापर करून त्यांनी ४०० पेक्षा अधिक टाक्या ग्रामीण भागात बांधून दिल्या आहेत. कमी खर्चात ही टाकी बांधून होऊ शकते. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातही त्यांनी हा प्रयोग यशस्वी करून दाखवला आहे.

बोरवेलविषयीही त्यांनी व्यवस्थित माहिती दिली. बोरवेलचे पुर्नभरण करणे (Recharge) कसे आवश्यक आहे हे आवर्जून सांगितले. मुलुंडचे रहिवासी असणारे परांजपे तेथील नागरिकांना त्यांच्या प्रश्नांवर मार्गदर्शनही करतात. तसेच कार्यशाळाही घेतात. हा कार्यक्रम माहितीपूर्ण असा होता.

नागरिक दक्षता शाखेच्या कार्यवाह विनीता हाटे यांनी उल्हास परांजपे यांची मुलाखत घेतली. लोकमान्य सेवा संघाचे कार्याध्यक्ष उदय तारदाळकर यांनी समारोप केला तर अध्यक्ष दीपलक्ष्मी पेठे यांनी आभार मानले.

# किमया स्टेम सेल्सची - डॉ. रमेश भोंडे

शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी स्टेम सेल्स या विषयातील मान्यताप्राप्त संशोधक आणि मधुमेहावर आधुनिक उपचार पद्धती अमलात आणण्यासाठी विशेष संशोधन करणारे तज्ज्ञ डॉ. रमेश भोंडे यांची प्रकट मुलाखत, पार्ले कट्टा या स्थानिक समितीने आयोजित केली होती.

डॉ. रमेश भोंडे यांनी प्राणीशास्त्रातील पदवी फर्ग्युसन महाविद्यालयातून तर M.Sc ची पदवी पुणे विद्यापीठातून प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी Ph.D पदवी राष्ट्रीय विषाणू विज्ञान प्रयोगशाळेतून प्राप्त केली. पुणे विद्यापीठातील राष्ट्रीय कोशिका विज्ञान केंद्रात वैज्ञानिक म्हणून अनेक वर्षे ते कार्यरत होते. त्यानंतर त्यांनी बंगळूरस्थित स्टेमप्युटिक्स या संस्थेत तंत्रसंचालक म्हणून जबाबदारी स्वीकारली. याच संस्थेच्या मलेशिया येथील शाखेतही ते संशोधन विभागात कार्यरत होते. बंगळूरस्थित मणिपाल विद्यापीठाच्या स्कूल ऑफ रिजनरेटिव्ह मेडिसीन येथे अधिष्ठाता म्हणून पाच वर्षे अध्यापन केल्यानंतर सध्या ते पिंपरी येथील डी. वाय. पाटील विद्यापीठात संशोधन संचालक म्हणून काम करीत आहेत.

मधुमेह या विकारावर ते गेली पंचवीस वर्षे संशोधन करीत असून स्वादुपिंडातील पेशींचे पुनरुज्जीवन हा त्यांच्या विशेष अभ्यासाचा व संशोधनाचा विषय आहे. या अभ्यासाला अनुसरून मूळ पेशी, जैविक पेशींचे पुनरुज्जीवन व उती अभियांत्रिकी या विषयात त्यांनी अभ्यासपूर्ण प्राविण्य मिळविले आहे.

मूळ पेशी अर्थात स्टेम सेल म्हणजे काय, त्यांचे कार्य आणि त्यांचा मानवात एक उपचार पद्धती म्हणून कसा उपयोग करता येईल हे डॉ.भोंडे यांनी अतिशय सोप्या भाषेत सांगितले.

मूळ पेशी किंवा स्टेम सेल या आपल्या शरीरातील मूलभूत पेशी आहेत. आपल्या शरीरातील प्रत्येक अवयवात त्या सुप्तावस्थेत असतात. मानवी भृणापासून (embryo) ते प्रौढ मानवापर्यंत सर्व ठिकाणी त्यांचे अस्तित्व असते. त्यांना त्याप्रमाणे भृणस्थ (अपरिपक्व) किंवा प्रौढ मूळ पेशी असे संबोधिले जाते. भृणावस्थेतल्या जीवाची वाढ हे भृणस्थ मूळ पेशीचे कार्य असते तर प्रौढ मूळ पेशी या मानवी उतींची दुरुस्ती व पुनर्निर्मिती याचे काम करतात. शरीरात कोठेही दुखापत झाली तर तेथे दुरुस्तीचे काम या मूळ पेशी करतात. या पेशींचा स्रोत प्रौढ माणसाच्या अस्थीमज्जेत (bone marrow )असतो. तसेच शरीरातील चरबी, दात, हिरड्या, नाळ येथेही त्यांचे अस्तित्व असते असे आता संशोधनात आढळून आले आहे. आईच्या दुधातही मूळ पेशी असतात व बाळाच्या निकोप वाढीस त्या उपयुक्त ठरतात. अस्थीमज्जेतून या मूळ पेशी अत्यल्प प्रमाणात बाहेर पडून रक्तप्रवाहात प्रवेश करतात. शरीराची कोठे हानी झाली आहे का याचा त्या शोध घेतात व जरूर पडल्यास तेथे किरकोळ दुरुस्तीचे काम करतात. परंतु अपघातासारख्या प्रसंगी शरीराची मोठी हानी झाली तर त्यांच्या या दुरुस्तीच्या कामाला मर्यादा पडतात. म्हातारपणी शरीरातील उतींचा ऱ्हास होतो व त्यांची कार्यक्षमता कमी होते, अशा प्रसंगी मूळ पेशी उपयुक्त ठरू शकतील का, असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. म्हातारपणी अशी अपरिहार्य प्रकारे होणारी शारीरिक हानी भरून काढण्याची क्षमता मूळ पेशींमध्ये असते. अशा वेळी लवणद्राव किंवा सलाईन द्वारे मूळ पेशी शरीरात भरणे शक्य असते. याला 'मूळपेशी उपचार पद्धती' असे म्हणण्यात येते.

अस्थीमज्जेतून या पेशी बाहेर काढून त्या प्रयोगशाळेत वृद्धींगत करता येतात व अशा प्रकारे पुनर्निर्मित झालेल्या या पेशी पुन्हा शरीरात टोचून शरीर रोगमुक्त करता येते.



डॉ.रमेश भोंडे यांच्याशी संवाद साधताना डॉ.अनुया पालकर

प्राण्यांवर व मानवांवर केलेल्या प्रयोगातून मूळपेशी उपचार पद्धतीने मधुमेही रुग्णांवर उपचार करणे शक्य झाले आहे. ही उपचार पद्धती अजून प्रायोगिक अवस्थेत असून त्याला प्रमाणित उपचार पद्धतीचा दर्जा अध्याप मिळालेला नाही. यामुळे याच्या वापरावर काही निर्बंध असून भारत सरकारने याचा गैरवापर टाळण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली आहेत. भविष्यात मूळ पेशी या जणू 'जादुई पेशी' ठरण्याचा संभव असून त्यामुळे त्यांचे हे शरीर पुनर्गठीत करण्याचे कार्य कसे चालते हे समजावून घेणे इष्ट आहे. मूळ पेशी शरीराची हानी भरून काढणारी वृद्धीकारक तत्त्वे उत्सर्जित करीत असतात असे आता सिद्ध झाले आहे. मूळपेशींवरील संशोधनाने भविष्यात रोगोपचार पद्धतीचे एकूण स्वरूपच बदलले जाणार असून त्यामुळे मानवी जीवन अधिक निरामय होईल असा दिलासा त्यांनी दिला. ही उपचार पद्धती म्हणजे मानवाला मिळालेले अमरत्वाचे वरदान जरी नसले तरी शरीर स्वास्थ्य टिकवण्याचे आणि सुखी जीवनाचे ते एक महत्वाचे साधन होणार आहे.

म्हणजेच आधुनिक काळात गुडघेदुखीवर सुद्धा स्टेम सेल्स इंजेक्ट करून ही व्याधी नक्कीच बरी करता येईल. त्यामुळे शस्त्रक्रिया टाळता येईल आणि त्यामानाने खर्चही कमी होईल. हे ऐकताना ज्येष्ठ नागरिकांना नक्कीच दिलासा मिळाला.

निरीक्षणातून असेही समजले आहे की दोन वर्षांच्या बाळाच्या हिरडीमधील आणि पंचाहत्तर वर्षे वयाच्या व्यक्तीच्या हिरडीतील स्टेम सेल्स हे सारखेच आहेत. निसर्गाची किमया ही आहे की कोणाचेही स्टेम सेल्स कोणालाही उपयोगी पडू शकतात.

मूल जन्माला आल्यावर गर्भाशयातून बाहेर पडणाऱ्या प्लॅसेंटामधे स्टेम सेल्स असतात. त्यांचे विलगीकरण करून, प्रयोगशाळेत प्रक्रिया करून त्या विशिष्ट पोषकद्रव्यात विकसित करतात आणि ठराविक तापमानाला त्यांचे जतन करतात. अशा पेशींचा उपयोग प्रयोगशाळेत औषधनिर्मिती साठी, औषधांचे विषारी गुणधर्म तपासण्यासाठी तर होतोच परंतु उपचारासाठी ही त्यांचा उपयोग करून घेता येतो. फक्त या पेशी मिळविण्यासाठी त्या मातेची संमती असणे आवश्यक आहे.

म्हणजेच डॉक्टर म्हणतात ''हा प्रकार म्हणजे टाकाऊ पासून टिकाऊ, trash to treasure!!!'' चा आहे.

आईशी जुळलेली नाळ जशी रोगप्रतिकारक शक्ती देते तसेच आईचे दूधही देते. मातेच्या दुधातील पेशी, स्टेम सेल्स बाळाच्या वाढीसाठी उत्तम काम करतात. ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. नॅचरल स्टेम थेरपी- निसर्गदत्त देणगी!! याची परतफेड जन्माला आलेलं मूलही करत असते. जन्माच्यावेळी अर्भकाच्या रक्तादवारे मातेच्या रक्तप्रवाहात स्टेम सेल्स प्रवाहित होतात. बाळंतपणानंतर पाच वर्ष या स्टेम सेल्स मातेच्या शरीरात काम करतात. या नैसर्गिक स्टेम सेल्सच्या स्त्रोतामुळे आई आणि बाळाची जास्त जवळीक असते आणि यामुळेच बाळंतपणात किंवा त्यानंतर आईच्या चेहऱ्यावर किंवा शरीरावर एक प्रकारचा ग्लो किंवा तेज दिसते.

मग हे स्टेम सेल्स मिळवायचे कसे? डॉ. भोंडे म्हणतात की प्रयोगशाळेतून तर मिळतीलच परंतु सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे तुमच्याच शरीरातून. उदाहरणार्थ तुमच्या शरीरातील मेद पेशींत असणाऱ्या स्टेम सेल्स वर योग्य ती प्रक्रिया करून गुडघ्यात नवीन कुर्चा निर्माण करण्यासाठी त्यांचा उपयोग होतो. साधारण हजार पेशींपासून दहा लाख पेशी निर्माण होऊ शकतात. असे स्टेम सेल्स योग्य तापमानाला फ्रीझ केले जातात. यालाच 'स्टेम सेल बँकिंग' म्हणजे वैद्यकीय उपचारांमध्ये भविष्यातील वापरासाठी मानवी शरीरातून काढलेल्या स्टेम पेशी गोळा करून त्या पेशींवर प्रक्रिया करून संग्रहित करणे असे म्हणतात. स्टेम सेल बँक दूषित होऊ नये आणि सेलची जैविक वैशिष्ट्ये टिकून रहावीत यासाठी कमी तापमान राखणे आवश्यक असते. त्यासाठी द्रवरूप नायट्रोजन चा वापर केला जातो.

कुठलीही नवीन उपचार पद्धती विकसित करण्यासाठी अथक परिश्रमांबरोबरच सर्वतोपरी पोषक वातावरण असणे आवश्यक असते. Funds, Freedom and Facilities. यासाठी आपले सरकार मदत करतेच आहे.'' आर्थिक मदत आणि अद्ययावत प्रयोगशाळा याविषयी मी पूर्णपणे संतुष्ट आहे असेही त्यांनी खास नमूद केले.

शास्त्रज्ञांना वाटते की स्टेम पेशी या रोगांवर उपचार करण्यास नक्कीच मदत करू शकतात कारण त्या इतर विविध प्रकारच्या पेशींमध्ये चांगला बदल करू शकतात. निद्रिस्त पेशींना उद्युक्त करतात. खराब झालेल्या उती तसेच अवयवांची दुरुस्ती करण्यास नक्कीच मदत करतात.महत्त्वाची बाब अशी की या पेशींचा उपचारासाठी वापर करताना कुठल्याही प्रकारचा विपरित परिणाम होण्याची शक्यता अजिबात नाही. त्यासाठी क्लिनिकल ट्रायल्स चालू आहेत पण भविष्यात हे निश्चितच साध्य होईल याची डॉ. भोंडे यांना खात्री आहे.

स्टेम सेल्स आणि मधुमेह या विषयी बोलताना डॉ. म्हणाले ''स्टेम सेल्सचा उपयोग करून इन्सुलिन तयार करू शकतो पण एक डोस इन्सुलिन तयार करण्यासाठी जवळपास एक लाख स्टेम सेल्स लागतात. ते बरेच खर्चिक आहे.

खास नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे डॉ. भोंडे यांना स्टेम सेल्स पासून इन्शुलीन तयार करणाऱ्या पेशी प्रयोगशाळेत निर्माण करण्यात यश मिळाले आहे आणि यासाठी त्यांना गौरवण्यात आले आहे.

याचबरोबर टीएमए पै अध्यासन दोनदा मिळण्याचा दुर्मिळ सन्मान त्यांना प्राप्त झाला आहे. हबीबुल्ला ओरेशन पुरस्कार, गोल्डन ब्रिज पुरस्कार, भारत गौरव पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आले आहेत.

अनेक असाध्य रोगांपासून मुक्ती मिळवण्यासाठी स्टेम सेल थेरपीचा वापर करता येईल. जसे की मधुमेहाबरोबरच, हाडांची झीज, जखम, पार्किन्सन रोग, अल्झायमर रोग, हृदयरोग, स्ट्रोक, कर्करोग, आणि osteoarthritis या सर्व रोगांवर स्टेम सेल थेरपीचा निश्चितच फायदा होऊ शकतो. इतकंच काय सौंदर्य टिकवण्यासाठी हल्ली प्रचलित असलेल्या बोटॉक्स उपचार पद्धतीला पर्यायी उपचार पद्धती म्हणूनही हिचा वापर करता येतो.

स्टेम सेल्सचा व्यावसायिक वापर करताना अनैतिक प्रथा टाळण्यासाठी आणि रूग्णांचे संरक्षण करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार केली गेली आहेत. त्यामुळे ह्या स्टेम सेल्स थेरपीचा उपयोग त्या तत्वांच्या कक्षेतच केला जाऊ शकतो.

या अतिशय उत्कृष्ट आणि नाविन्यपूर्ण मुलाखतीचा शेवट मुलाखतकार डॉ अनुया पालकर यांनी अतिशय चतुरतेने डॉ रमेश भोंडे यांच्या बरोबर रॅपिड फायर राऊंड खेळून केला.



अनुराधा तारदाळकर
९८१९५८९६९९



# Photographer of the month- संजय सावंत

आपली आवड, आपला एखादा छंद आपल्याला जास्तीतजास्त काळ जोपासता यावा यासारखा दुसरं आनंद नसतो. अनेकजण आपल्या व्यस्त दिनचर्येत आपला छंद जोपासण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतात पण जेव्हा तो वेळ मिळेनासा होतो तेव्हा नाराजीने त्याचा नाद सोडून देतात. परंतु आनंदाची गोष्ट म्हणजे या बाबतीत मी मात्र भाग्यवान ठरलो. अर्थात योग्य वेळी योग्य तो निर्णय घेतल्यामुळेच असेल कदाचित. फोटोग्राफी या आपल्या आवडीच्या छंदाला व्यवसायात रूपांतर करून 'फोटो फोकस स्टुडिओ' या नावाने विलेपार्ले हनुमान रोड येथे पार्लेकरांना फोटोग्राफीची सेवा गेली २५ वर्षे मी देत आहे.

कोलेजच्या दिवसांपासूनच मला फोटोग्राफीची प्रचंड आवड. साठ्ये कॉलेजमध्ये शिकत असताना मी पार्ल्यातील नामवंत डॉक्टर शशिकांत वैद्य यांच्याकडे रिसेप्शनिस्ट म्हणून काम करत होतो. तेव्हा त्यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांच्या सल्ल्याने मी कॉलेज व पार्ट टाईम नोकरी सांभाळून जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सचा फोटोग्राफीचा डिप्लोमा केला आणि त्यानंतर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फोटोग्राफीचे ॲडव्हान्स फोटोग्राफीचे शिक्षण घेतले. आणि त्यानंतर हाच आपला व्यवसाय असं मनोमन ठरवून कामाला सुरवात केली. आणि आता गेली २५ वर्षांपासून इव्हेंट फोटोग्राफीच्या माध्यमातून पार्ला व पार्ल्याबाहेरील बऱ्याच सुप्रसिद्ध व मान्यवर व्यक्तींच्या कुटुंबातील लग्न समारंभ व इतर अनेक कार्यक्रमांसाठी फोटोग्राफीसाठी मला आवर्जून बोलावले जाते. फोटोग्राफी ही एक आर्ट आहे इतर अनेक कलांप्रमाणेच ही सुद्धा एक क्रिएटिव्ह प्रोसेस आहे. त्यामुळे दिसतंय त्याचा फोटो काढणे एव्हडेच न करता नुसता सिंगल फोटो बघितला तरी तो अपिलिंग वाटला पाहिजे, फोटोग्राफी करताना फोटो बोलला पाहिजे आणि त्यातून काहीतरी मेसेज पोहोचला पाहिजे यावर माझा अधिकाधिक कल असतो. लग्न, मुंज अशा समारंभात candid फोटोग्राफीच्या माध्यमातून आपले संस्कार व आपले धार्मिक विधी लोकांपर्यंत इंटरेस्टिंग पद्धतीने पोहोचावे हा माझा प्रयत्न असतो. गेल्या अनेक वर्षांच्या फोटोग्राफीच्या प्रवासात फोटोग्राफी संदर्भात प्रॉडक्ट फोटोग्राफी, इंटिरियर फोटोग्राफी,



बेबीज शूट, प्रोफाइल फोटोग्राफी अशी सर्व प्रकारची फोटोग्राफी प्रोजेक्ट्स मी करत आहे.

महाविद्यालयात शिक्षण घेत असताना पहिल्या आणि दुसऱ्या वर्षांच्या विद्यार्थ्यांना त्यांना असलेली फोटोग्राफीची आवड याकडे साईड इन्कमची सोय किंवा एक फायदेशीर करिअर म्हणून बघता यावं आणि अशी इच्छा असणाऱ्या मुलांना फोटो अकॅडमी यांच्या माध्यमातून व्यावसायिक फोटोग्राफी तंत्रज्ञानाचा अभ्यास फुल टाइम किंवा पार्ट टाइम फोटोग्राफी व्यवसाय कसा सुरू करावा याचे शिक्षण देत आहे.

माझ्या मते फोटोग्राफी या क्षेत्रात करिअर किंवा व्यवसायाच्या अनेक संधी आता निर्माण झाल्या आहेत. सध्याच्या डिजिटल युगात फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी शिवाय कोणताही व्यवसाय करता येणं अवघड आहे. ॲडव्हटायझिंग आणि मार्केटिंग, सोशल मीडिया मार्केटिंगमध्ये फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफी याचा खूप मोठा रोल असतो. आम्ही पार्ल्यातील बऱ्याच सामाजिक संस्थाना फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफीची सेवा देत आहोत. फोटोग्राफीमध्ये कॅन्डीड फोटोग्राफी हा माझा आवडीचा विषय. कॅन्डीड एक्सप्रेशन कॅच करून फोटो काढणं हे माझ्या जास्त आवडीचं काम. अर्थात ही एक कला आहे आणि दरवेळी प्रत्येक प्रोजेक्ट मधून नवनवीन शिकायला मिळत असतं.

## फोटोविषयी

मुळात फोटो काढणे हा माझा व्यवसायच असल्यामुळे आजपर्यंत अनेक फोटो मी काढलेत. तरीही एक आर्टिस्ट म्हणून काही निवडक फोटो फोटोग्राफरचे फेव्हरेट असतात. त्यापैकीच हा एक फोटो. लग्न प्रसंगी कितीही प्रोफेशनल फोटोग्राफर बोलावले तरीही काहींना सेल्फी काढायचा मोह टाळता येत नाही. या फोटोतही या मुलीच्या डोळ्यात नेमके हेच भाव मी पकडलेत. एव्हढ्या सगळ्या फोटोग्राफर आणि व्हिडिओग्राफरच्या गोतावळ्यातदेखील आजच्या प्रसंगाचा फोटो माझ्या मोबाईलमध्ये हवाच आणि तिच्या ह्या मागणीपुढे तिचा होणारा नवरादेखील कौतुकाने तिला पोज देत आहे. म्हणून हा फोटो मला खूप आवडतो. तांत्रिकदृष्ट्या ह्या फोटोकडे न बघता ह्या फोटोत त्या दोघांचा टिपलेला चेहऱ्यावरचा भाव मला खूप आवडून गेला. माझ्या दृष्टीने हीच ह्या फोटोची खरी खासियत आहे.



संजय सावंत
९८२०९५९५७२



# अंधेरी वाचन कट्टा

रविवार २६ जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजता चिल्ड्रन्स वेल्फेअर विद्यालय, यारी रोड ,वर्सोवा येथे अंधेरी वाचन कट्टाचा ३८ वा कार्यक्रम 'आझादी की जंग फिल्मों का संग' हा श्री. रामदास कामत यांचा कार्यक्रम संपन्न झाला.



नेहमीप्रमाणे संस्थापक प्रदीप पाटील यानी प्रास्ताविक केले. तदनंतर सौ.सुहास आठले यानी रामदास कामत यांच्या बहुआयामी व्यक्तीमत्वाचा परिचय करून दिला व त्यानंतर कार्यक्रमाची सुत्रे रामदास कामत यांच्याकडे दिली.

रामदास कामत यानी सुरूवातीस हा कार्यक्रम करण्यामागचा उद्देश व त्याचे स्वरूप सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात १९४७ पुर्वीच्या एका हिंदी चित्रपट गीताने होतो. कवि प्रदीप यांच्या त्या गीतात ब्रिटीश सत्तेला हाकलवून देश स्वतंत्र करण्याची जिद्द शब्दबद्ध केली होती. म्हणजेच देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात चित्रपटांचेही योगदान होते. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालेल्या युद्धांचा इतिहास जनतेपर्यंत पोहोचवण्यात चित्रपटांचा किती वाटा आहे हे अधोरेखित करणारा हा कार्यक्रम आहे. १९६२ च्या भारत चीन युद्धापासून आताच्या ऊरी सर्जिकल स्ट्राइक पर्यंतच्या युद्धातील आपल्या जवानांनी दाखवलेले अभूतपूर्व शौर्य व त्यांचे बलिदान याचा परिचय ते श्रोत्यांना करून देतात. यात हकीकत, शहीद, हिंदुस्तान की कसम, बॉर्डर, गाझी अटॅक, एल ओ सी कारगिल या चित्रपटातील दृश्यांचा समावेश आहे.

या सर्व युद्धांची आपली पिढी साक्षीदार आहे. पण आपल्याला त्यातील इतकी सखोल माहिती नसते. हा कार्यक्रम बघताना आपल्या सैनिकांच्या कामगिरीचा गर्व वाटला. कठीण आणि विपरीत परिस्थितीतही ते किती धैर्याने लढतात याचे चित्र रामदास कामत यानी डोळ्यासमोर उभे केले.



हा कार्यक्रम सादर होताना रामदास कामत यांचा युद्ध, परराष्ट्रनीती, भारतीय सैन्यदले याविषयीचा गाढा अभ्यास व कष्ट दिसून येतात. तसेच त्यांची आपल्या देशाप्रती असलेली कळकळ व निष्ठा दिसून येते. इतकी की बोलताना काहीवेळा रामदास कामत अक्षरश:भावनावश होतात. सर्व प्रेक्षक जवळपास पावणेदोन तास भारावलेल्या अवस्थेत होते. कार्यक्रमाच्या शेवटी मंजिरी कुलकर्णी यानी थोडक्यात कार्यक्रमाचा आढावा घेऊन रामदास कामत व प्रेक्षकांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी पडद्यावर संपूर्ण राष्ट्रगीत दाखवले गेले व त्याचे सामुदायिक गायन झाले. कार्यक्रमानंतर विजयाताई कोर्टीकर यांनी २६ जानेवारीचे औचित्य साधून रामदास कामत यांना आणि उपस्थितीत सभासदाना स्वखर्चाने कर्नल शरदचंद्र पाटील (निवृत) लिखीत 'सैनिक हिमालयाचा' या पुस्तकाच्या प्रती भेट म्हणून दिल्या. त्याचप्रमाणे अंधेरी वाचन कट्ट्यातर्फे लेखिका नीला चांदोरकर यांचे 'जगावेगळा लिंडबर्ग' हे पुस्तक खुद्द लेखिकेच्याच हस्ते रामदास कामत याना भेट देण्यात आले.

अंधेरी वाचनकट्ट्यातर्फे रामदास कामत यांना दिलेले मानधन (रू.सहा हजार ) आणि आपल्या सभासदानी उस्फूर्तपणे देणगी दिलेले २४ हजार रूपये, एकूण तीस हजार रूपये रामदास कामत हे सैनिक फंडाला देणगी स्वरूपात देणार आहेत.

रामदास कामत हे नेहमीच या कार्यक्रमाचे मानधन अधिक प्रेक्षकांकडून मिळालेली रक्कम आयोजक मंडळाच्या नावाने सैनिक कल्याण निधीला देतात. हा खरच एक स्तुत्य उपक्रम आहे. मला तर असे वाटते की या उपक्रमाद्वारे रामदास कामत हे सैन्याचाच एक भाग बनले आहेत. म्हणजे extended military personnel. नंतर बोलताना रामदास कामत यानी एक खंत बोलून दाखवली की या कार्यक्रमास मागणी वर्षातून केवळ १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दोनच दिवशी येते. रामदास कामत हा कार्यक्रम विनामूल्य (कारण मानधन सैनिक कल्याण निधला दिले जाते) करतात. स्वत:चा वेळ व पैसे खर्च करून कार्यक्रमस्थळी जातात. हे केवळ आणि केवळ देश आणि सीमेवर लढत असलेल्या आपल्या जवानांप्रती असलेल्या प्रेम, आदर आणि निष्ठेपोटी. रामदास कामत याना अंधेरी वाचन कट्टा तर्फे सलाम.

नेहमीप्रमाणेच ध्वनीसंयोजन आणि प्रोजेक्टर, स्क्रीन याची व्यवस्था अंधेरी वाचन कट्ट्याचे सभासद व अविभाज्य घटक असलेले मनोज पाध्ये यानी उत्तमरीत्या सांभाळली.



प्रदिप पाटील
९८१९०६३०६९



# वेचक पुस्तके वाचताना...

'भाषण करणे' ही एक बिनीची वाककला आहे. समोरच्या श्रोत्यांना आपल्या रसाळ वाणी आणि वैचारिक, तात्विक नी मुद्देसूद बांधणीने मंत्रमुग्धही करणे हे खरोखरच कौशल्यपूर्ण काम. सुदैवाने उत्तम वक्त्यांची वानवा आपल्या भारतदेशाला कधीच नव्हती. मुखात सरस्वती असलेल्या कित्येक रथीमहारथींनी आपले वाकनैपुण्य पणाला लावून पारतंत्र्यविद्वेषाचे, जनजागृतीचे, समानता व शिक्षण प्रसाराचे आणि समाजप्रबोधनाचे मोठे काम केलेले आहे.



श्री अशोक बेंडखळे

जेष्ठ लेखक श्री अशोक बेंडखळे यांचे सदर पुस्तक, विविध क्षेत्रांमधील अशा निवडक, महत्वाच्या वाकपटूतज्ञांच्या भाषणांचे, एका छताखाली पुस्तकरूपाने संकलन करण्याचे तितकेच महत्वाचे काम करते. पुस्तकाचे शिर्षक आहे '५१ नामवंतांची भाषणे'. पुस्तकाच्या मुखपृष्ठ आणि मलपृष्ठावर अंतर्भूत केलेल्या दिग्गज भाषणकारांची नावे येतात. 'जे कृष्णमूर्ती ते नारायणमूर्ती' अशी क्रमांक १ ते ५१ अशी नुसतीच शुभ-सांख्यिकी यादी समोर अवतरत नाही, तर विविध विषयांवर मौलिक विचार मांडणारी आणि म्हणून विचार करायला लावणारी अत्युत्तम भाषणे घरबसल्या या पुस्तकाच्या माध्यमातून आपल्या कानात, मनात रेंगाळत रहातात. 'श्रवण कसे करावे आणि ते का करावे' हे सांगणारे जे कृष्णमूर्ती इथे आहेत, 'अफूचा घातक व्यापार स्थानिकांच्या मुळावर उठणार आहे' हे भाष्य आधीच करून ठेवणारे द्रष्टे दादाभाई नवरोजी आपल्याला भेटतात. सुधारणावंचित शेतकरी व धनगर समाजालाही समृद्धी लाभावी यासाठी तत्कालीन ब्रिटीश सरकारने काय केले पाहिजे हे महात्मा जोतिबा फुले ठासून सांगतात. त्यांच्या सखोल कृषिविषयक ज्ञानाने आपण थक्क होतो. त्याचबरोबर स्वदेशीचा मंत्र देणारे लाला लजपतराय, पाकिस्तानचा ढोंगीपणा चव्हाट्यावर मांडणारे सरदार वल्लभभाई पटेल, स्त्रीशिक्षण व स्त्रीदास्यविमोचनासाठी सदैव कृतीशील राहिलेल्या सरोजिनी नायडू, स्वांतत्र्यपश्यात भारताने कायम शस्त्रसिद्ध रहाण्याची गरज आहे असे जाज्वल्य विचार मांडणारे स्वातंत्र्यवीर सावरकर, व्यवसायाची एककल्ली व धोपटमार्गी व्यवस्था निर्मून,




अन्यांना चौफेर व्यक्तीमत्व घडवण्यास प्रतिबंध करणारी व समाजाचे अपरिमित नुकसान करणारी हिंदू चातुर्वर्ण्य पद्धती यावर योग्य घणाघाती टीका करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर, व्यवसाय उन्नतीसाठी मार्गदर्शन कर णारे जे आर डी टाटा तसेच त्यांचे सुपुत्र रतन टाटा, कुष्ठरोगी व अपंगांच्या पुनर्वसनाविषयी सांगणाऱ्या मदर टेरेसा तसेच बाबा आमटे, चित्रपटनिर्मितीची लेन्सच्या अल्याडची बाजू दाखवणारे सत्यजित रे, पंतप्रधानपदाची शपथ घेतांना व्यक्त होणाऱ्या इंदिरा गांधी, समान नागरी कायद्याविषयी काही वेगळी व नोंदणीय मते मांडणारे नि. न्यायमूर्ती पी बी सावंत, सर्वांचे आदरणीय एरोस्पेस शास्त्रज्ञ डॉ अब्दुल कलाम, स्वतंत्र्य तिबेटसाठी बलाढ्य चीनशी शांततापूर्ण मार्गाने लढणारे दलाई लामा आणि अर्थात आजचा माहिती-तंत्र्यानसाक्षर भारत घडवण्यात मोठा वाटा असलेले नारायणमूर्ती अशा तब्बल ५१ विभूती, विदुषी आणि वाकविशारद व्यक्तींची मांदियाळी, श्री अशोक बेंडखळे सदर पुस्तकातून आपल्यासाठी घेऊन येतात. विस्तारभयापोटी संक्षेपात हे लिहावे लागत आहे. पण 'धाग्यावरून ताग्याची परीक्षा' तद्वतच सदर पुस्तकाची उपयुक्तता व वाचनीयता ध्यानात येतेच.

अनंत हिऱ्यामोहऱ्यांमधून फक्त ५१ व्यक्ती निवडायच्या, त्यांच्या विपुल भाषणांमधून, विषय व शैलीची पुनरोक्ती टाळणारी नेमकीच भाषणे खटपट करून मिळवायची, काही भाषणांचे अतिशय सुंदर, सोप्या मराठीत भाषांतर करायचे हे खरेतर दुस्तर, खडतर काम. पण आपल्या हौशी, व्यासंगी आणि परिश्रमी वृत्तीच्या अशोकसरांनी हे विचार-सघन पुस्तक वाचकांसाठी आणले आहे. हिऱ्याला सुवर्णकोंदण, तशी जेष्ठ विचारवंत श्री कुमार केतकर यांची दमदार प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. श्री अरविंद जोशी यांच्या 'संधिकाल प्रकाशनाने' अतिशय सुबक स्वरूपात हे पुस्तक काढले आहे.

प्रत्येक सुजाण आणि संवेदनशील वाचकाच्या हे पुस्तक संग्रही असावे. विशेषत: संस्कारक्षम वयातील कुमार व युवकांनी तर ते वाचावेच वाचावे असा आग्रह या पुस्तकाबाबत म्हणूनच धरावासा वाटतो.



आशुतोष उकिडवे
९८२०४१७०३१

विलेपार्ल्याची खाद्यजत्रा

# चविष्ट व अस्सल चायनीज पदार्थांचे 'शांघाय' !

चायनीज म्हणजेच चिनी संस्कृतीत असणारे पदार्थ हे जगभरात लोकप्रिय आहेत. या पदार्थांमध्ये प्रामुख्याने विविध चवी तसेच मसाल्यांचे मिश्रण असते. चायनीज खाद्यसंस्कृतीची वैशिष्ट्ये अशी की, यात पाच मूलभूत चवींचा समतोल असतो—गोड, आंबट, तिखट, कडसर आणि खारट. चॉपस्टिक्सचा वापर हा खाण्यासाठी केला जातो, तसेच तळणे, वाफवणे, परतणे आणि शिजवणे यांसारख्या स्वयंपाक पद्धतींचा समावेश असतो.



भारतामध्ये चिनी पदार्थांचा प्रभाव मोठा आहे, आणि इंडो-चायनीज पदार्थ अधिक लोकप्रिय आहेत. चायनीज पदार्थ हे केवळ चवीलाच नव्हे, तर विविधतेला महत्त्व देणारे आहेत. स्थानिक रूपांतर झाल्यामुळे ते अधिक चवदार आणि आवडते बनले आहेत. यावेळी मी 'शांघाय' या चायनीज रेस्टॉरंटला भेट दिली. विश्वेश केसकर हे या रेस्टॉरंटचे चालक-मालक आहेत. 'शांघाय' या नावाचा अर्थ विचारल्यावर त्यांनी सांगितले की, शांघाय हे चीनमधील सर्वात मोठे शहर आणि प्रमुख आर्थिक केंद्र आहे. हे जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या महानगरांपैकी एक असून, येथे आधुनिकता आणि पारंपारिक संस्कृती यांचा संगम पाहायला मिळतो. चायनीज क्यूझिन असलेल्या या रेस्टॉरंटला तसेच नाव देण्यात आले आहे. या रेस्टॉरंटची सुरुवात २०१० साली झाली असून, ते सध्या पार्ल्यातील खाऊगल्लीत वसले आहे. आम्ही तेथे स्टीव्ह (स्टू) राईस, मंगोलियन पनीर, पॉट राईस आणि बटर गार्लिक प्रॉन्स या पदार्थांचा आस्वाद घेतला.





रेस्टॉरंटच्या ॲंबियन्समध्येही चिनी संस्कृतीचा समावेश आहे. मंद प्रकाश आणि सौम्य रंगसंगतीमुळे उत्तमरीत्या चायनीज पदार्थांचा आस्वाद घेता येतो. स्वच्छ किचन बरोबरच दुसरी महत्वाची खासियत म्हणजे, येथे एकही सॉस (हुनान सॉस, मंगोलियन सॉस, हॉट गार्लिक सॉस, शेझवान सॉस ) बाहेरून न आणता, तो त्यांच्या खास पद्धतीने किचनमध्येच तयार केला जातो. विशेष म्हणजे, अजिनोमोटोचा (MSG) कोणत्याही सॉसमध्ये वापर केला जात नाही. सोया सॉस वगळता सर्व सॉसेस् अजिनोमोटोशिवाय बनवले जातात. जर गर्भवती महिला किंवा लहान मुले सोया सॉस असणारे पदार्थ खाणार असतील, तर त्याआधी त्यांना सोया सॉसमध्ये अजिनोमोटो असल्याची पूर्वसूचना दिली जाते.

शुद्ध आणि चविष्ट चायनीज पदार्थांसाठी 'शांघाय' रेस्टॉरंट नक्कीच एक उत्तम निवड आहे. जर तुम्ही पारंपरिक चायनीज पदार्थांचे चाहते असाल, तर येथे एकदा तरी अवश्य भेट द्या!





**साक्षी महेंद्र महाडीक**
९३२१८११३७८

# उत्कट एकल नाट्याविष्कार- 'सांगत्ये ऐका'

अगदी पूर्वी नाटके रात्रभर चालायची. रात्री प्रयोग सुरू झाला की पहाटेपर्यंत चालायचा. त्यानंतर आली तीन अंकी नाटके. सध्या रंगभूमीवर होतात दोन अंकी नाटके आणि तीही फार फार तर दोन तासांची.

हे सगळं लिहायचे कारण म्हणजे ह्या ही पुढे जाऊन सध्या रंगभूमीवर एक नवा ट्रेंड आलाय आणि तो म्हणजे दीर्घांक. मध्यांतर न घेता सलग दीड तासाचा प्रयोग, आणि ह्याला प्रेक्षकांचा बऱ्यापैकी प्रतिसाद लाभत आहे. हौशी आणि प्रायोगिक नाट्यसंस्थानी जरी याची सुरुवात केलेली असली आणि नाममात्र तिकीट दर असले तरी याला मिळणारा प्रतिसाद पाहता लवकरच व्यावसायिक रंगभूमीही याचा स्वीकार करेल असं वाटतं. मोजकीच पात्रे, सुटसुटीत नेपथ्य, कुठेही सहज प्रयोग करता येईल असे स्वरूप असल्याने निर्मात्यालाही ते परवडते.



नुकताच जुन्या काळातील सुप्रसिद्ध अभिनेत्री (त्याकाळात नटी म्हणायचे) हंसा वाडकर यांच्या जीवनावरील 'सांगत्ये ऐका' हा दीर्घांक पाहण्याचा योग आला. चित्रपट अभिनेत्री हंसा वाडकर यांनी एकेकाळी अनेक मराठी आणि हिंदी सिनेमे गाजवले. अखेरच्या काळात त्यांनी 'सांगत्ये ऐका' हे आत्मकथन लिहिलं. ते खूप गाजलं. आपल्या आयुष्यातील या सगळ्या उलथापालथींचा, स्थित्यंतरांचा ऊहापोह हंसाबाईंनी आपल्या 'सांगत्ये ऐका' या आत्मकथनात केला आहे. १९५९ साली प्रदर्शित झालेल्या 'सांगत्ये ऐका' या चित्रपटात हंसा वाडकर यांनी भूमिका केलेली होती. त्यावरूनच ह्या आत्मकथनाला हे नाव ठेवले असावे बहुतेक.

'आविष्कार' या संस्थेने याची निर्मिती केली असून सूत्रधार अरुण काकडे आहेत. विश्वास सोहोनी यांनी या आत्मकथनाचे नाट्यरूपांतर आणि दिग्दर्शन केले आहे. या दीर्घ अंकाचे वैशिष्ट्य असे की सादरीकरणाचा पूर्ण डोलारा मानसी कुलकर्णी ह्या गुणी अभिनेत्रीने यशस्वीरीत्या सांभाळला आहे. म्हणूनच हे एकल नाट्य आहे. प्रयोगानंतर हंसा वाडकर मनात घर करुन राहते याचे श्रेय मानसीच्या अभिनय कौशल्याला जाते. 'सांगत्ये ऐका' ही कहाणी ही एक शोकांतिका आहे.

सुरुवातीलाच एक नृत्य आणि पुढचा असा भावोत्कट, अखंड दीर्घांक एकट्या व्यक्तीने पेलणे यासाठी लागणारी ऊर्जा प्रेक्षकांसह गुजगोष्टी करताना दुनियेवर अनावर राग, आई आणि नवऱ्याने केलेल्या अविश्वासाचा स्वतःला त्रास करून घेतलेला बदला आणि आपल्याच चुका प्रांजळपणे कबूल करण्याचा मनाचा अलिप्तपणा, त्याच बरोबर मुले, घरसंसाराची ओढ, त्यासाठी काहीही सोसण्याची तयारी आणि प्रत्येक वेळी नियतीचे उलटे पडणारे दान .....

नाट्य रूपांतर करताना विश्वास सोहोनी यांनी प्रभावी संवाद लिहिले आहेत. आणि हा संवाद स्वतःशी आणि पर्यायाने प्रेक्षकांशी साधताना मानसीचे दिसणे, चालणे, बोलणे, बघणे, व्यक्तिगणिक आवाजात आणि आविर्भाव शैलीत करत असणारा बदलाव लाजवाब आहे.

आत्मकथनावरून नाट्यरूपांतर करताना दिग्दर्शक विश्वास सोहोनी यांनी हंसाबाईंच्या संघर्षमय जीवनातील मोजकेच प्रसंग कोरून ते नाट्यमयरीतीने प्रेक्षकांसमोर मांडले आहेत. मुळात नाटकाचा कॅनव्हास सिनेमापेक्षा छोटा. त्यातही एकपात्री प्रयोगात या कॅनव्हासला आणखीनच मर्यादा येतात. पण तरीही एकातून एक प्रसंगांची सलग मालिका गुंफण्याचं कौशल्य दिग्दर्शकाने दाखवलं आहे. विश्वास सोहोनी हे नाव नाट्य क्षेत्राला जसे नवे नाही तसेच ते पार्लेकरांनाही नवे नाही. अनेक आंतर महाविद्यालयीन एकांकिका/नाट्य स्पर्धेत म. ल. डहाणूकर महाविद्यालयाला पुरस्कार मिळवून देणारे आणि सध्या व्यावसायिक रंगभूमीवर, मालिका आणि चित्रपटातून झळकणाऱ्या काही कलाकारांना घडवणारे अशी त्यांची ओळख आहे.

मोजकेच नेपथ्य, एकच कलाकार आणि अवघ्या दीड तासाचा अवधी म्हणून याला प्रायोगिक म्हणायचे पण दर्ज्यामध्ये हा एकल नाट्यप्रयोग कुठल्याही व्यावसायिक नाटकापेक्षा कमी नाही.



मानसी कुलकर्णी, विश्वास सोहोनी



रामदास कृष्णा कामत
९८९०६८५२३५

# डॉ. मेधा शेटे 'समाजकार्य' पुरस्काराने सन्मानित

दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी विलेपार्ल्याच्या स्वा. सावरकर सेवा केंद्राच्या ३७ व्या वर्धापन दिनी केंद्राचे संस्थापक कै. रामभाऊ बर्वे यांच्या नावाने प्रतिवर्षी दिला जाणारा समाजकार्य पुरस्कार या वर्षी पारल्यात गेली ४१ वर्षे पार्ले पॅथॉलॉजिकल लॅब




च्या माध्यमातून कार्यरत असणाऱ्या सुप्रसिद्ध पॅथॉलॉजिस्ट डॉ.मेधा अरुण शेटे यांना प्रदान करण्यात आला.

संस्थेचे कार्यवाह श्री केशव परांजपे आपल्या प्रास्ताविकात म्हणाले," एक उत्तम, पारदर्शी आणि आत्मीयतेने काम करणाऱ्या पॅथॉलॉजिस्ट म्हणून पार्ले व आसपासच्या परिसरात लोक मेधाताईंना ओळखतातच. परंतु या व्यतिरिक्तही अनेक क्षेत्रांमध्ये त्या भरीव योगदान देत आहेत. गेली १० वर्षे त्या स्वा. सावरकर केंद्राच्या कार्यकारी मंडळावर असून सावरकर केंद्रातील समर्थ विचार मंच आणि थॅलेसेमिया मुक्त विले पार्ले अभियान तसेच स्वा. सावरकर यांच्या साहित्याला वाहिलेले नि:शुल्क पुस्तकालयही या सर्वाचे श्रेय मेधाताईंचेच आहे.

या कार्यक्रमाला मेधाताईंच्या मातोश्री श्रीमती उषा काळे, लहान भाऊ श्री रवींद्र काळे, तसेच त्यांच्या नायर इस्पितळातील पैथोलॉजीच्या प्राध्यापिका डॉ. फाटक तसेच अनेक मान्यवर व मेधाताईंचे सहकारी डॉक्टर प्रेमाने उपस्थित होते. यानंतर लेखिका क्षमा गोसावी यांनी अतिशय मोजक्या शब्दात आपल्या जवळच्या माणसांना जपणाऱ्या आणि विशेष प्रसंगी त्यांना गोड धक्का देणाऱ्या मेधाताईंच्या प्रेमळ स्वभावाचे काही दाखले दिले.

मेधाताईंच्या आई, श्रीमती उषाताई काळे यांचे मनोगत श्री रवींद्र काळे यांनी वाचून दाखविले. त्यात उषाताई म्हणाल्या," मेधाचे वडील कै. दिगंबर काळे हे अनेक सामाजिक कार्यात कार्यरत होते. टिळक मंदिराचे पदाधिकारी म्हणूनही त्यांनी अनेक वर्षे कार्य केले. त्यांच्या सामाजिक कार्याचा वारसा आज मेधा चालविते आहे याचा अभिमान आहे. कै. रामभाऊ बर्वे यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. आज त्यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार मेधाला मिळाला आहे याचा आम्हाला विशेष आनंद आहे.'

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. सत्यजीत कोसंबी म्हणाले, 'प्रत्येकजण स्वत:साठी एक दिशा शोधत असतो. आज मी आपल्याला सांगू इच्छितो की आजच्या कार्यक्रमानंतर मलाही माझा मार्ग खुणावतो आहे. आणि मी विचारपूर्वक त्या दिशेने मार्गक्रमण करण्याचा प्रयत्न करेन."

सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. शेखर अंबर्डेकर यांनी आपले



मनोगत व्यक्त करताना नमूद केले की माझ्या हातून डॉ. मेधा शेटे यांचा सन्मान करताना मला माझाच सन्मान झाल्यासारखं वाटत आहे. मला आणि माझ्याप्रमाणे इतर डॉक्टरांना सुद्धा डॉ. मेधा यांच्या पार्ले प्रयोगशाळेतून रुग्णाचे रिपोर्ट्स मिळाले की आम्ही निर्धास्त पणे आमच्या पुढच्या कामाला लागतो.

डॉ. शेखर अंबर्डेकर यांच्या मनोगतानंतर सौ. लीना रेडकर यांनी सन्मानपत्राचे वाचन केले व त्यानंतर टाळ्यांच्या गजरात डॉ. अंबर्डेकर यांच्या हस्ते डॉ. शेटे यांना सन्मानपत्र, फळांची परडी व रु. दहा हजाराचा धनादेश देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. मेधाताईंनी पुरस्काराची रक्कम थायलेसेमिया अभियानाला दान केली.

सत्काराला मेधाताईंनी दिलेले उत्तर हे त्यांच्या ऋजु आणि नितळ व्यक्तिमत्वाची प्रचितीच होती. त्यांनी आपली आई श्रीमती उषाताई काळे आणि त्यांच्या शिक्षिका डॉ. फाटक उपस्थित असल्याबद्दल मनापासून आनंद व्यक्त केला. आपले आई-वडील व कुटुंबीय, तसेच शिक्षक डॉ. फाटक व डॉ. आजगावकर यांचा आपल्या जडणघडणीत मोठा वाटा असल्याचे सांगून कुठल्याही विषयाचे सखोल ज्ञान व आकलन करून घेण्याच्या संस्काराचे श्रेय गुरुजनांना दिले. त्याचबरोबर आपला पार्ले पैथोलॉजी लॅबचा आजवरचा प्रवास हा माझ्या अत्यंत तळमळीने काम करणाऱ्या सहकाऱ्यांशिवाय शक्यच झाला नसता हेही आवर्जून सांगितले. त्या पुढे म्हणाल्या, ' मी त्यांना एकच गोष्ट आग्रहाने सांगते की आपल्याकडे लोक येतात , ते त्यांना काहीतरी खूपत- दुखत म्हणून. त्यांच्याशी आपण नेहमी आत्मीयतेने आणि सहृदयतेनेच वागले पाहिजे. त्यामुळे आमच्या लॅबमध्ये कायम सकारात्मक व खेळीमेळीचे वातावरण असते. माझा स्टाफ म्हणजे माझे विस्तारित कुटुंबच आहे.'

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. विनिता हाटे यांनी केले. डॉ. सत्यजित कोसंबी यांच्या बहारदार गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.






## संदीप दहिसरकर यांच्या पुस्तकाला पुरस्कार

पुरातत्वशास्त्र व इतिहास अभ्यासक आणि लेखक संदीप दहिसरकर यांनी संपादित केलेल्या 'दि हिस्टोरीयोग्राफी ऑफ श्री बिंबाख्यान' या त्यांच्या नव्या




पुस्तकाला कोकण इतिहास परिषदेचे २०२४ चे कोकणावरील सर्वोत्कृष्ट पुस्तक म्हणून 'श्री गंगाधर नारायण जोशी पारितोषिक १ फेब्रुवारी २०२५ रोजी रुपारेल महाविद्यालयात झालेल्या राष्ट्रीय कॉन्फरेन्स मध्ये प्रदान करण्यात आले. सदर पुस्तक मुंबईच्या माध्ययुगीन इतिहासावरील इंग्रजीतले एकमेव पुस्तक असून १४६ पूर्वी श्री बिंबाख्यानची पोथी जुहू येथील रघुनाथ पुतळाजी राणे यांनी पहिल्यांदा छापली होती. त्यानंतर महिकावातीची बखर या नव्या नावे बिंबाख्यानची दुसरी पोथी १९२४ ला इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी छापली होती. तब्बल १०० वर्षांनी दहिसरकर यांना पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळ मध्ये बिंबाख्यानची नवी पोथी सापडली व ती त्यांनी या पुस्तकात प्रसिद्ध केली आहे.या पुस्तकाला सुप्रसिद्ध मराठी लेखिका डॉ. अरुणा ढेरे यांची प्रस्तावना आहे.



# चाकोरी पलीकडे - ४: बागान

म्यानमार बद्दल मला पूर्वीपासून खूप कुतूहल वाटत आलं आहे. एक तर - अगदी आपल्या कुंपणापलीकडे असूनही, शाळेतील इतिहास/भूगोलाच्या धड्यांमध्ये आपल्याला म्यानमारबद्दल काहीही शिकवलं जात नाही. दुसरं म्हणजे, गेल्या ७-८ दशकांमधील म्यानमारमध्ये सतत चाललेल्या राजकीय उलथापालथी आणि त्यातून होणाऱ्या रक्तपातामुळे तेथे प्रत्यक्ष भेट देणं बहुतेक काळ जवळजवळ अशक्यच होतं.

तेथील ह्या सततच्या अस्थिर वातावरणात मध्येच तुलनेने शांततेचा आणि राजकीय स्थैर्याचा एक छोटासा कालखंड (२०१५ ते २०२१) आला. आणि त्यात या सुंदर देशातील समृद्ध संस्कृतीची तोंडओळख आणि अगत्यशील लोकांशी संवाद साधण्याची संधी मला सुदैवानेच मिळाली.

एका दृष्टीने पाहिलं तर संपूर्ण म्यानमारच चाकोरी बाहेरचा प्रदेश आहे कारण भारतातून थायलंड किंवा श्रीलंकेला जेव्हढे पर्यटक दरवर्षी जातात त्याच्या एक शतांशसुद्धा म्यानमारला जात नसावेत. परंतु आज मी लिहिणार आहे फक्त बागानबद्दल - प्राचीन म्यानमारमधील एका सर्वात महत्वाच्या साम्राज्याची राजधानी.

दक्षिण-पूर्व आशियातील बहुतांश भागावर हजारो वर्षांपासून भारतीय संस्कृतीचा खोलवर प्रभाव पडलेला आपल्याला दिसतो. रामायण आणि महाभारतासारखी महाकाव्ये, भारतीय परंपरेतील पौराणिक कथा ह्यांचा प्रभाव स्थानिक संस्कृती आणि लोककथांमध्ये इतका खोलवर रुजलेला आहे की आजही बहुतेक सर्वत्र दैनंदिन जीवनात तो आपल्याला जाणवतो - स्थानिक नावे, पारंपारिक कला किंवा स्थानिक प्रथा अशा विविध रूपात. ह्या भागातील ऐतिहासिक अवशेष पाहताना प्राचीन भारतीय स्थापत्य-शैली आणि कलेचा प्रभाव आपल्याला स्पष्टपणे दिसतो. मात्र, प्रत्येक ठिकाणी (उदाहरणार्थ कंबोडियातील ख्मेर, इंडोनेशिया/बालीमधील श्रीविजय/मजापहित, थायलंड मधील आयुत्थाया अथवा म्यानमारमधील बागान साम्राज्य) त्यांच्या प्रकट आविष्कारात स्थानिक कल्पना, आकृतिबंध आणि अलंकार ह्यांचं मिश्रण होऊन त्या-त्या प्रदेशाचं स्वतंत्र व्यक्तिमत्व दिसतं. बागानमधील अवशेषांतही हेच आपल्याला आढळतं.

अर्थात म्यानमार ऐतिहासिक काळापासून संपूर्णपणे बौद्ध आहे. रामायण/महाभारताऐवजी बौद्ध परंपरेतील जातक कथा जनमानसावर जास्त राज्य करतात. त्यामुळे बागानमधील प्राचीन अवशेषांमध्येही पूर्णपणे बौद्ध परंपराच दिसतात. कंबोडिया किंवा इंडोनेशिया सारखं हिंदू आणि बौद्ध विचारधारांचं मिश्रण बागान (किंवा एकूणच म्यानमार) मध्ये आपल्याला जाणवत नाही.

बागान हे १०००० देवळांचं गाव म्हणून पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. बहुतेक वेळा एखाद्या शहराची क्षितिजरेषा (Skyline) त्याची प्रातिनिधिक ओळख म्हणून प्रसिद्धी पावते. उदाहरणार्थ - पॅरिसच्या Skyline मध्ये आयफेल टॉवर कुठूनही पाहिलं तरी दिसतोच. न्यू यॉर्कच्या skyline मध्ये स्वातंत्र्यदेवीचा पुतळा येतोच. मरीन ड्राइव्हची skyline मुंबईची खूण म्हणून सगळीकडे परिचित झाली आहे. तसेच बागानच्या skyline मध्ये कुठूनही पाहिलं तरी दिसतात अगणित देवळांचे कळस.



**पहा पहिला फोटो.** पहाटे तांबडफुटीच्या वेळी आकाशाचं छत पेलून धरणाऱ्या ह्या शिखरांच दृष्य तर अवर्णनीय आहे. **- दुसरा फोटो.**



साधारण आठव्या/नवव्या शतकांपर्यंत आजचा म्यानमार अनेक छोट्या नगर-राज्यांमध्ये विभागलेला होता. त्याचं एकत्रीकरण होऊन संपूर्ण देशभर पसरलेलं प्रथम साम्राज्य म्हणजे बागान. नवव्या शतकात इरावड्डी (इरावती??) नदीच्या खोऱ्यात राहणाऱ्या म्रान्मा (बम्मार) लोकांची सत्ता हळूहळू प्रबळ होत गेली. आणि राजा प्यांबा (Pyianbya) ह्याने बागानला तटबंदी बांधून आपली राजधानी स्थापन केली. मात्र पुढे अकराव्या शतकात राजा अनाव्रथाने (अनिरुद्ध??) खऱ्या अर्थाने संपूर्ण म्यानमार आपल्या बागान साम्राज्यात एकत्रित केलं. पुढची दोनशे वर्षे हा म्यानमारचा (आणि बागानचा) सुवर्णकाळ मानला पाहिजे, बागान शहर नुसतं सत्ताकेंद्र न राहता तत्कालीन धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक केंद्र बनलं. अगदी चीन, भारत अश्या तत्कालीन प्रगत परदेशांतूनही व्यापारी, तीर्थयात्री किंवा विद्यार्थी बागानमध्ये येऊन राहत असत. ह्याच काळात बागान मध्ये लहान-मोठी अंदाजे १०००० बौद्ध देवळं आणि स्तूप बांधले गेले.

त्यातील सुमारे २००० आजही अस्तित्वात आहेत. **पहा तिसरा** आणि **चौथा फोटो -**





रायांगझू गटातील स्तूप आणि थातबिनयु मंदिर. आणि त्याकाळात बांधलेली आनंद मंदिर किंवा श्वेझिगन पॅगोडा सारखी प्रार्थनास्थळं त्यांच्या पूर्व-वैभवात आजही वापरात आहेत.

अर्थात जरी ही १०००० मंदिरं बागान साम्राज्याच्या वैभवाची निदर्शक असली तरी, दुसऱ्या बाजूने पाहिलं तर बागानच्या विनाशाचं मूळही ह्या अति-धार्मिकतेतच होतं असं म्हणायला हवं. कारण ही मंदिरं बांधण्यासाठी आणि ती सुस्थित ठेवण्यासाठी राज्यसंस्था आणि राज्यातील धनवान नागरिक ह्यांनी इतकी संपत्ती खर्च केली, की राज्याची आर्थिक परिस्थिती पूर्ण डबघाईला गेली. आणि त्यामुळे दुर्बल झालेल्या एकेकाळच्या ह्या समृद्ध साम्राज्याचा तेराव्या शतकात आराकान (राखीन), मॉन, शान अश्या स्थानिक जमातींनी केलेले उठाव आणि उत्तरेकडून झालेलं मंगोल सेनांचं आक्रमण ह्यांत अंत झाला.

पण त्यांनी मागे ठेवलेला अद्भुत कलाविष्कार आजही डोळे दिपविणार आहे. उदाहरणार्थ **पहा पाचवा फोटो -** आनंद



मंदीराचा. हे नेत्रदीपक मंदिर बांधलं राजा कायांझिथा (ज्ञानसिद्ध?) ह्या राजा अनाव्रथाच्या मुलाने. त्यामागची दंतकथा अशी आहे की राजाला एक दृष्टांत झाला आणि त्यात त्याला भारतामधल्या ''नंदमूळ'' गुहेतील बौद्ध मंदिर दिसलं. (''नंदमूळ'' नावाची खरीच एखादी जागा भारतात होती की काय, हे कोणालाच माहित नाही!) राजाला त्या दृष्टांतात दिसलेल्या मंदिराची प्रतिकृती म्हणजे आनंद मंदिर. आत गेल्यावर खरोखरच आपण एखाद्या गुहेत आहो की काय असा भास मंदिराच्या रचनाकाराने अतिशय कुशलतेने निर्माण केला आहे. त्यात चार गर्भगृशांत चार बुद्धांच्या (थेरवाड बौद्ध परंपरेत अनेक 'बुद्ध' पुजले जातात) सागवानी मूर्ती आहेत - कस्सपा (कश्यप) बुद्ध, काकुसंध (क्रकुच्छंद), कोंगमन (कनकमुनि) आणि श्याक्यमुनी (गौतम बुद्ध). त्यातील दोन मूळ देवळातील म्हणजे १२०० वर्ष जुन्या आहेत! **पहा सहावा फोटो.** आणि ह्या चारही





बुद्धमूर्तींना प्रदक्षिणा घालण्याचा मार्ग तळापासून वरच्या छपरापर्यंत बुद्धजीवनातील प्रसंग आणि बुद्धाच्या शिकवणी संबंधित सुंदर मूर्तींनी मढवलेला आहे.

आनंद मंदिरा इतकाच भव्य आणि कलाकुसरीच्या बाबतीत कदाचित त्याहूनही वरचढ आहे श्वेझिगन पॅगोडा. **पहा सातवा फोटो.** हा खुद्द राजा अनाव्रथाने बांधला. ह्याची



रचना ११व्या शतकातील बुद्धगयामधील महाबोधी मंदिराच्या आराखड्यावर आधारित आहे. ह्याच्या मुख्य पिरॅमिडच्या आत खुद्द गौतम बुद्धाचा दात आणि त्याच्या गळपट्टीच्या हाडाचा (Collar Bone) तुकडा पुरलेला आहे असं म्हणतात. त्याची दंतकथा अशी आहे की राजा अनाव्रथाने ह्या हाडाच्या तुकड्याची पांढऱ्या हत्तीवरून मिरवणूक काढली आणि एका छोट्या टेकडीपाशी तो हत्ती अडून बसला. तेंव्हा त्याच ठिकाणी श्वेझिगन पॅगोडा बांधण्यात आला. श्वेझिगनचं आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे त्याच्या प्रवेशद्वाराशी असलेला थाग्यमिन ह्या द्वारपालाच्या पुतळा. **पहा आठवा फोटो.** प्राचीन म्यानमार परंपरेमध्ये



'नट' नावाचे दुय्यम दर्जाचे देव (आपले यक्ष किंवा शिवगण ह्यांसारखे) कल्पिले आहेत. थाग्यमिन हा ह्या नटांचा राजा. काही लोकांच्या मते हे नट म्हणजे थेरवाड बौद्ध धर्म म्यानमार मध्ये रुजण्या आधी येथे असलेल्या हिंदू परंपरेतील ''देवांचा'' शिल्लक राहिलेला अवशेष आहे. स्थानिक लोकं बौद्ध धर्म स्वीकारू लागल्यावर त्यांनी आपले काही पुरातन प्रघात आपल्या बरोबर आपल्या नव्या धर्मात आणले, त्यातलाच हा एक! बागान मध्येच असलेल्या येथील १०००० बौद्ध देवस्थानातील एकमेव हिंदू (विष्णू) देवळाचं नावंच मुळी आहे नाथ्यान्क्यौंग (Nat-Hlaung-Kyaung) म्हणजे शब्दशः ''नट कोंडून ठेवलेले देऊळ''! कदाचित बौद्ध धर्माला राजाश्रय मिळाल्यावर, त्याचा प्रसाराला आडकाठी होऊ नये म्हणून अजून पूर्णपणे नष्ट न झालेल्या असलेल्या हिंदू समजुतींना ''कैद'' करण्याची ही शक्कल कोणीतरी लढवली असेल. असो. हे विष्णू मंदिर बागान मधील सर्वात पुरातन देवळांमध्ये मोडतं. **पहा नववा फोटो** येथील



गर्भागारातील शेषशायी विष्णूमूर्तीचा.

खरं तर आनंद मंदिर, श्वेझिगन पॅगोडा, सुलामणी, धम्मयंजी अश्या येथील प्रत्येक भव्य मंदिरांवर एकेक स्वतंत्र लेख लिहिता येईल. बागान आणि तेथील देवळांबद्दल ऑन-लाईन तुम्हाला पुष्कळ माहिती मिळेल. जरा खोलात जाण्याएवढं तुमचं कुतूहल जर हा लेख वाचून जागृत झालं असेल तर पॉल स्ट्राचान ह्याचं Bagan: Art and Architecture of Old Burma नावाचं पुस्तक मिळवून जरूर वाचा.



सतीश जोशी
९८२०२२८२७९

# म. ल. डहाणूकर महाविद्यालयात 'उद्‌भव' चे आयोजन

'उद्‌भव' हा डहाणूकर कॉलेजचा तेथील मराठी वांग्मय मंडळाने आयोजित केलेला एक आंतरमहाविद्यालयीन सोहळा आहे ज्याची सुरुवात ही २०२३ साली झाली. आपली मराठी भाषा व संस्कृती जोपासावी हेच त्यांचे ध्येय डोळ्यासमोर ठेऊन हा सोहळा आयोजला जातो. या सोहळ्यात इतर महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी होतात. यात साहित्यिक कला, ललित कला आणि प्रायोगिक कला यांचा समावेश असतो. या मध्ये वेगवेगळ्या स्पर्धा, जसे की वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, चारोळी लेखन स्पर्धा, मेहेंदी स्पर्धा, पुणेरी पाटी स्पर्धा, मराठी व्यक्तिमत्त्व स्पर्धा इत्यादींचे आयोजन केले जाते. उत्स्फूर्तपणे स्पर्धक आपल्या कला सादर करतात. विद्यार्थ्यांचे परीक्षण करण्यास आणि त्यांच्या गुणांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने मराठी सिनेक्षेत्रातील दिग्गज कलाकारांनी या सोहळ्याला आपली उपस्थिती लावली आहे. सौरभ गोखले, किरण माने, संभाजी सावंत, स्वप्नील राजशेखर, पंढरीनाथ कांबळे, पियूष रानडे, प्राप्ती रेडकर अशा अनेक सुप्रसिद्ध कलाकारांनी 'उद्‌भव'ला पाठिंबा दिला.

गेली दोन वर्षे 'उद्‌भव' हा वेगवेगळ्या स्वरूपात आपल्या समोर आला. पहिल्या वर्षी मराठी भाषा तर दुसऱ्या वर्षी मायबोली अशा सुंदर स्वरूपात. या ही वर्षी नव्या उत्साहात येत आहे 'उद्‌भव २०२५' पर्व तिसरे. यंदाचे 'उद्‌भव' होत आहे येत्या २५ फेब्रुवारीला. या वर्षीची थीम ही अर्थातच वेगळी असून लक्षवेधक ठरणार आहे. आपल्या लाडक्या मराठी शाळेच्या आठवणी जाग्या करायला आणि आजच्या पिढीला मराठी शाळांचे महत्व दाखवून देण्याच्या उद्देशाने यंदाच्या उद्‌भवची थीम असणार आहे ती म्हणजे 'मराठी शाळा संवर्धन'

गेली दोन वर्षे होत असलेल्या या महोत्सवाला अनेकांचा हातभार लाभला आहे. एल आय सी, जाई काजळ, क्रेझी चीझी, सहयोग, फास्ट अँड उप, प्राइड, एमइटी आणि बरेच या परिवारात सामील होत गेले. या वर्षीचा सोहळासुद्धा यशस्वी करण्यासाठी आपण देखील यात सामील होऊ शकता. तुमची छोट्यातील छोटी मदत देखील मोलाची ठरू शकते. चला तर मग भेटुयात २५ फेब्रुवारीला म. ल. डहाणूकर महाविद्यालयात !




## डॉ. अविनाश ठाकुरदेसाई यांचा 'टी एम एम' क्लब तर्फे गौरव

सर्वसाधारणपणे जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात होणारी 'Standard Chartered Marathon' जी आता Tata Mumbai Marathon' या नावाने प्रसिद्ध असून मुंबईमधील क्रीडाप्रेमी ज्याची आतुरतेने वाट पाहत असतात. या संदर्भात पार्लेकरांना अभिमान वाटावा अशी बातमी म्हणजे पार्ल्यातील नामवंत डॉक्टर अविनाश ठाकुरदेसाई यांनी सलग १८ वर्ष सातत्याने यात भाग घेऊन ही स्पर्धा पूर्ण केली आहे. १६ वेळा 'फुल मॅरेथॉन' आणि दोन वेळा 'हाफ मॅरेथॉन'साठी धाऊन त्यांनी ही स्पर्धा पूर्ण केली आहे. 'Tata Mumbai marathon' ने नुकत्याच स्थापन केलेल्या 'TMM Legends club' तर्फे त्यांना गौरवण्यात आलं. सलग १० वेळा किंवा त्यापेक्षा जास्त वेळा भाग घेऊन स्पर्धा पूर्ण केलेल्या खेळाडूंना गौरवण्यात येतं, त्या अंतर्गत डॉ. अविनाश यांना ट्रॉफी आणि प्रशस्तीपत्रक देऊन त्यांच्या कामगिरीची नोंद घेतली गेली. डॉ अविनाश यांनी भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात शिवाजी पार्क मैदानाला चालून आणि सायकलिंग करून ७५ किमी. पूर्ण करून एका वेगळ्या पद्धतीने अमृत महोत्सव साजरा केला होता. डॉ. ठाकूरदेसाई हे जनरल सर्जन असून अंधेरी येतील त्यांच्या 'सुश्रुत नर्सिंग होम' च्या बरोबरीने पार्ला परिसरातील काही हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहेत. या शिवाय 'व्यावसायिक स्वास्थ्य' या विषयात ते पारंगत असून अनेक कंपन्यांमध्ये मेडिकल ॲडव्हायझर या पदावर काम बघतात. अशा आपल्या व्यस्त दिनचर्येतून वेळ काढून फिटनेस आणि खेळ स्वास्थ्यासाठी किती महत्वाचे आहेत याचे उत्तम उदाहरण त्यांनी सर्वांना दिले आहे. त्यांचे पार्लेकारांकडून अभिनंदन आणि अनेक शुभेच्छा.






